# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**शुक्रवार, दिनांक ०४ ऑगस्ट, २०१७ / श्रावण १३, १९३९ ( शके )**

| | |
|---|---|
| (१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री<br>(२) ग्रामविकास, महिला व बाल कल्याण मंत्री<br>(३) वैद्यकीय शिक्षण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री<br>(५) जलसंधारण, राजशिष्टाचार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री<br>(६) रोजगार हमी, पर्यटन मंत्री | } यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - १०६**

---

### मालनगाव (ता.साक्री, जि.धुळे) धरणातून पाणीपुरवठा करण्यासाठी साक्री नगरपंचायतीने सादर केलेल्या प्रस्तावाबाबत

**(१) * ३३३९९ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालनगाव (ता.साक्री, जि.धुळे) धरणातून साक्री शहरासाठी पाईपलाईनने पाणीपुरवठा करण्याचा साक्री नगरपंचायतीने सादर केलेला प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साक्री शहराला पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई असताना अजूनही उक्त प्रस्तावाला मान्यता दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्ताव तातडीने मंजूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या स्थायी आदेशानुसार प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर करणे आवश्यक आहे.

तथापि, साक्री नगरपंचायतीकडून पाणीपुरवठा योजनेचा कोणताही प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे प्राप्त झालेला नाही.

-----------------

## नागपूर येथील मेडीकल रुग्णालयात डेक्सा स्कॅन यंत्र सुरु नसल्याबाबत

**(२) * ३३२०५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील वैद्यकीय रुग्णालयात रुग्णांच्या आजाराचे तात्काळ निदान व्हावे, त्यांना औषधोपचार मिळावे म्हणून १५० कोटींच्या पंतप्रधान आरोग्य सुरक्षा योजनेतून अस्थिरोग विभागाने शासनाकडे “डेक्सा स्कॅन” या अत्याधुनिक मशिनची मागणी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयात माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये यंत्र उपलब्ध झाले असून जागेअभावी चार महिने उलटूनही डेक्सा स्कॅन यंत्र सुरु करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन डेक्सा स्कॅनपासून रुग्ण वंचित असल्याने जबाबदार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदर यंत्र कधीपासून कार्यान्वित करण्यात येणार आहे ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर यंत्राची मागणी ही अस्थिव्यंगोपचारशास्त्र या विभागाची नसून ती औषधवैद्यकशास्त्र विभागाची आहे.

(२) हे खरे नाही.

माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये यंत्र प्राप्त होऊन ते प्रस्थापितही करण्यात आलेले आहे, सदर यंत्र हाताळणारे अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण सुरु असून सदर प्रशिक्षण पूर्ण होताच यंत्र रुग्णसेवेसाठी कार्यान्वित होईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील ससून रुग्णालयाच्या विस्तारीत इमारतीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३) * ३३९३३ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून रूग्णालयाच्या अकरा मजली विस्तारीत इमारतीसाठी प्राप्त झालेला रुपये १२ कोटीचा निधी शासनाकडे परत गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी परत गेल्यामुळे रुग्णालय प्रगतीसाठी खाजगी उद्योजकांकडून मिळणारा निधी प्राप्त होवू शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ससून रूग्णालय विस्तारीत इमारतीचे काम सुरू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## आरोग्य विभागाने श्वानदंशावरील लसीची खरेदी न केल्याबाबत

**(४) * ३२६७३ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१६-१७ मध्ये आरोग्य विभागाने केंद्रीयस्तरावर श्वानदंशावरील लसीची खरेदी न केल्यामुळे राज्यातील जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात श्वानदंशाच्या लसीचा तुटवडा निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभाग ही लस स्थानिक पातळीवर रुपये १३७ प्रति वायल या दराने खरेदी करीत असून भारत बायोटेक ही कंपनी हीच लस रुपये १२६ प्रति दराने देण्यास तयार असताना सुध्दा ही लस कंपनीकडून न घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील सर्व आरोग्य केंद्रावर ही लस पुरेशा प्रमाणात उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील आरोग्य संस्थामध्ये श्वानदंश लसीचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

(२) सन २०१६ मध्ये आरोग्य सेवा संचालनालयाच्या दिनांक २८/०३/२०१६ च्या आदेशान्वये मे.भारत बायोटेक इंटरनॅशनल लि. यांच्याकडून रुपये १२६ प्रति वायल (आय.एम.) या दराने श्वानदंश लसीची खरेदी करण्यात आली होती.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये देखील श्वानदंश लसीच्या खरेदीकरीता मे.भारत बायोटेक इंटरनॅशनल लि. यांना प्रति वायल (IM Injection) रुपये १२६ या दराने श्वानदंश लसीचा पुरवठा करण्याबाबत आरोग्य सेवा संचालनालयाने दिनांक २८/०६/२०१७ रोजी आदेश दिले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५) * ३१०६९ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्यादित) या महामंडळास विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील लोकांचे राहणीमान समाजात उंचावणे व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींना व्याज दराने अर्थसहाय्य देवून त्यांची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक उन्नतीकरिता शासनाने मागील ३ वर्षापासून निधी उपलब्ध करून दिला नसल्याचे माहे मे-जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांनी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाला निधी देण्याचे बंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विमुक्त जाती व भटक्या जमाती या समाजातील लोकांच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक उन्नतीकरिता सदर महामंडळास निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही. वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रुपये २००.०० कोटी असून त्यापैकी, सन २०१४ ते २०१५-१६ अखेर पर्यंत रुपये १९५.९५ कोटी इतके भाग भांडवल सदर महामंडळास वितरीत करण्यात आले आहे.

तसेच सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात मुळ अर्थसंकल्पीत तरतुदींपैकी रुपये ४.०५ कोटी इतके भागभांडवल वितरीत करण्यात मान्यता देण्यात आली. तथापि, ३१ मार्च, २०१७ रोजी तांत्रिक अडचणींमुळे प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, मुंबई विभाग, नवी मुंबई यांच्या कार्यालयाकडून निधी प्राप्त होऊ शकला नाही.

(२) होय. राष्ट्रीय मागासवर्ग वित्तीय व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांना देय असलेली थकीत वसुली न भरल्याने त्यांचेकडून निधी प्राप्त झाला नाही.
(३) वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या भाग भांडवलाची मर्यादा संपुष्टात आली असल्याने, भाग भांडवलाच्या मर्यादेत टप्याटप्याने वाढ होण्याची आवश्यकता असल्याबाबत नियोजन विभागाने अभिप्राय दिलेले आहेत. तरी, सदर महामंडळाचे भाग भांडवल वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य कामगार विमा योजनेंतर्गत चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत

**(६) * ३४१६७ डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य कामगार विमा योजनेंतर्गत चालविल्या जाणाऱ्या रुग्णालयांची दुरवस्था झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयाच्या इमारती २५ वर्षापेक्षा जास्त जुन्या झाल्याने त्या जीर्ण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या रुग्णालयांच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** : (१) व (२) होय,
राज्य कामगार विमा योजनेतील ११ रुग्णालयापैकी बहुतांश रुग्णालयांची बांधकामे ३५ ते ४० वर्षापुर्वीची आहेत.

(३) याबाबत जी रुग्णालये २५ वर्षापेक्षा जास्त जुनी आहेत, अशा एकूण ११ राज्य कामगार विमा योजना रुग्णालयापैकी एकूण ०८ रुग्णालयांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून उर्वरीत ०३ रुग्णालयाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोयना धरणाचे पाणी कर्नाटक राज्याला देण्याबाबत

**(७) * ३११९८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरणातून कर्नाटक राज्याला पाणी दिल्यास कृष्णा व कोयना नदीकाठच्या गावांमध्ये पाणी टंचाई उद्‌भवू नये म्हणून सातारा जिल्हयातील लोकप्रतिनिधीनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान विरोध केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोयना धरणातील पाणी कर्नाटक राज्याला न देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) नाही.

कृष्णा व कोयना नदीकाठच्या गावात पाणी टंचाई उद्‌भवल्याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही. तसेच जिल्हाधिकारी सातारा यांचे मार्फत पिण्याच्या पाण्यासाठी मे - जून २०१७ मध्ये कोणतेही आरक्षण केलेले नाही.

कर्नाटक राज्याच्या दुष्काळी परिस्थितीचा विचार करता मानवतावादी दृष्टीकोनातून कोयना जलाशयातील उपलब्ध पाणीसाठा व पुढील कालावधीसाठी आवश्यक असलेल्या पाण्याचा विचार करून कर्नाटक राज्यासाठी दिनांक १३/०४/२०१७ ते दिनांक ०३/०६/२०१७ या कालावधीत ४.५३ TMC इतके पाणी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरवेली गुहागर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) परिसरामध्ये माकडांचा उपद्रव थांबविण्याबाबत

**(८) * ३२५१३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरवेली गुहागर (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) परिसरामध्ये माकडांचा उपद्रव मोठया प्रमाणात सुरु असून बागायतदार व शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माकडांचा बंदोबस्त करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी वन विभागाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन माकडांचा उपद्रव रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) हे खरे नाही. माकडांचा बंदोबस्त करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी वन विभागाकडे मागणी केलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेळघाट (जि.अमरावती) येथील जंगलामध्ये वणवा लागल्याबाबत

**(९) * ३२५९९ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील मेळघाटातील संरक्षित आणि अतिसंरक्षित व्याघ्र प्रकल्पाच्या दोन हजार पाचशे हेक्टर जंगलामध्ये वणवा लागल्याने जंगल नष्ट झाल्याचे दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाटचे जंगले वन आणि व्याघ्र अशा दोन भागात असून पूर्व आणि पश्चिम मेळघाट वन विभाग संरक्षित तर सिपना, गुगामेल आणि अकोट वन्यजीव विभागाचे जंगल अतिसंरक्षित असून आग विझविण्यासाठी बिटनिहाय वन मजूर नेमले असले तरी आदिवासींकडून विविध कारणांसाठी आगी लावण्यात येत असल्याने सरपटणाऱ्या प्राण्यांसह वन्यपशू होरपळले जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जंगलाला लागलेल्या वणव्यामागील कारणे काय आहेत व संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अमरावती जिल्हयातील मेळघाट वनक्षेत्र हे मेळघाट व्याघ्र प्रकल्प व अमरावती प्रादेशिक वनवृत्तात पसरलेले आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये सिपना, गुगामल व अकोट असे ३ वन्यजीव विभाग असून अमरावती प्रादेशिक वृत्तात पूर्व मेळघाट व पश्चिम मेळघाट या वनविभागांचा समावेश असून सदर ५ वनविभागामध्ये दिनांक १२ एप्रिल, २०१७ रोजी आग लागल्याची एकूण १५ प्रकरणे घडली असून, त्यात एकूण ११४.३५१ हेक्टर वनक्षेत्र जळाले आहे.

(२) मेळघाट वनक्षेत्रातील आग किंवा वनवणवा हा पुर्णतः मानवी हस्तक्षेपातुन निर्माण होणारा असून आगीमध्ये वनातील सरपटणारे प्राण्यासह वन्यपशू होरपळले जाण्याबाबतच्या घटना निदर्शनास आलेल्या नाहीत.

(३) सदर आगीच्या घटनांबाबत वनगुन्हे नोंद करण्यात आले असून, प्रकरणी संपुर्ण चौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) वन विभागामार्फत वनवणव्याचा मौसम सुरु होण्यापूर्वी दरवर्षी आग प्रतिबंधक आराखडा तयार करण्यात येतो. त्यानुसार आग प्रतिबंधक जाळरेषा तयार करणे, जाळरेषा कापणे व जाळणे बाबतची कामे संयुक्त वनव्यवस्थापन समितीमार्फत केली जातात. आगीच्या मौसमात जंगलामध्ये अग्निरक्षकांची नियुक्ती करण्यांत येते. तसेच आगीवर नियंत्रण ठेवण्याकरीता निरीक्षण मनोरे आहेत. सर्व परिक्षेत्रस्तरावर बिनतारी यंत्र संच बसविण्यात आले आहे. त्यामुळे आगीची सूचना ताबडतोब पुरविली जाते. परिक्षेत्रस्तरावर आग नियंत्रक पथकाची नेमणूक करण्यात येते. आगीची सूचना प्राप्त होताच पथक त्या ठिकाणी जावून आग विझविण्याचे काम करतात. परिक्षेत्रस्तरावर वनवणवा हंगामापुर्वी स्थानिक लोकांची जनजागृती सभा आयोजित केल्या जातात, तसेच विविध संदेश बोधक फलकाव्दारे स्थानिक लोकांना जागृत केले जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पाळणाघरांसंदर्भात स्वतंत्र धोरण, नियमावली तयार करण्याबाबत

**(१०) * ३२३९६ श्री.रामहरी रुपनवर, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राजीव गांधी पाळणाघर योजनेंतर्गत १८९५ पाळणाघरे तसेच खाजगी पाळणाघरे कार्यरत असून पाळणाघरासाठी स्वतंत्र कायदा किंवा नियमावली नसल्याने काही पाळणाघरांमध्ये लहान बालकांना, सांभाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून मारहाणीचे प्रकार होत असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पाळणाघरांचे कायदेशीर नियमन कसे करता येईल यासाठी शासन धोरण आखण्याच्या विचाराधीन असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाळणाघराची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सदर उच्चस्तरीय समितीने सुचविलेल्या मसुद्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) समितीच्या बैठका आयोजित करुन लवकरच पाळणाघरांसाठी नियमावली तयार करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे धमनी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे डेंग्यूचे रुग्ण आढल्याबाबत

**(११) * ३३८१३ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धमनी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान डेंग्यूचे ९ रुग्ण आढळल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन डेंग्यूच्या अळया नष्ट करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

शहापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, टेंभा अंतर्गत धामणी गावात तापरुग्ण संख्येत वाढ झाल्याने ताप उद्रेक घोषित करण्यात आला.

या गावात या कालावधीत एकूण ६२ ताप रुग्ण आढळून आले. त्यापैकी संशयित ६ ताप रुग्णांचे रक्तजल नमुने डेंग्युसाठी तपासण्यात आले. सदर सर्व ६ नमुने डेंग्यु दूषित आढळून आले आहे.

(२) मे, २०१७ मध्ये पाण्याच्या कमतरतेमुळे पाणी साठवून ठेवण्याच्या जनतेच्या प्रवृत्तीमुळे एडिस डास अळ्या वाढल्याने डेंग्युचे रुग्ण आढळून आले आहेत.

धामणी गावात ४४९ लोकसंख्येत ८४ घरे असून, २७ घरात एडिस डास अळया आढळून आल्या. या गावात तापरुग्ण संख्येत वाढ झाल्याने तात्काळ साथरोग प्रतिबंधात्मक व उपचारात्मक कार्यवाही अंतर्गत या गावातील एकूण ३८९ पाणीसाठे तपासण्यात आले. त्यापैकी ४० पाणीसाठ्यांमध्ये एडिस डास अळया आढळून आल्याने, ते सर्व दुषित पाणीसाठे रिकामे करण्यात आले. जनतेस आरोग्य शिक्षण देण्यात आले. तसेच ग्रामपंचायतीमार्फत धूर फवारणी करण्यात आली. त्यामुळे धामणी गावातील साथ त्वरीत कार्यवाही केल्यामुळे आटोक्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील राज्य कामगार विमा रूग्णालयात सलाईनमध्ये बुरशी आढळल्याबाबत

**(१२) * ३२३९८ श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील राज्य कामगार विमा रूग्णालयातील सलाईनमध्ये बुरशी आल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित पुरवठादार कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय,

अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ०७/०६/२०१७ अन्वये सादर केलेल्या अहवालात सदर IV fluid हे अप्रमाणित दर्जाचे असल्याने त्याला बुरशी चढली असल्याचे नमूद केले आहे.

सर्व वार्डमधून सदर IV fluid चा साठा परत मागविण्यात येऊन त्याचा वापर पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. पुरवठादारास सदर IV fluid चा साठा बदलून देणे अथवा देय केलेली रक्कम परत करण्याबाबत कळविले आहे.

तसेच, अन्न व औषध प्रशासनाकडून कार्यवाहीबाबत पुढील आदेश प्राप्त झाल्यानंतर पुरवठादाराविरुध्द आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळात नियोजनाच्या अभावामुळे अनुदान अखर्चित राहिल्याबाबत

**(१३) * ३०९९५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पर्यटनांना चालना देण्याबरोबरच सदर व्यवसाय विकसित करण्याची जबाबदारी असलेल्या महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या (एमडीडीसी) अनेक योजनांमध्ये मोठया प्रमाणात झालेल्या अनियमिततेमुळे महामंडळाचे कोटयवधी रूपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचे आरोप भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षकांनी (कॅग) दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी विधिमंडळास सादर केलेल्या अहवालात केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणात पुरातन लेणी, चांगले व प्रशस्त समुद्र किनारे, किल्ले, स्मारके, घनदाट जंगले, तिर्थस्थळे, सण, कलासंस्कृती अशी पर्यटन वाढीस पोषक परिस्थिती असतानाही समुद्र किनारी जाण्यासाठी आवश्यक ते रस्ते व पुल नसल्याने तसेच पर्यटकांना आकर्षित करण्याकडे व त्यांच्या सोयीसुविधांकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यटन महामंडळाच्या कारभारामुळे पर्यटन वाढीत गोवा आणि गुजरात राज्यांनी महाराष्ट्राला मागे टाकले असून अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार कारभारामुळे केंद्र आणि राज्य शासनाकडून मिळालेले रुपये २१९ कोटी अनुदानाचा विनियोग झालेला नसून, सदर नुकसान भरुन घेण्यासाठी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आणि किती रक्कम वसुल करण्यात आली,
(४) तसेच देशातील पर्यटकांचे प्रमाण ११.५१ असून राज्यात हे प्रमाण ११.१३ आहे तर गुजरातमध्ये हे प्रमाण १७.६८ तर गोव्यात ३२.५० आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी व हा व्यवसाय विकसित करण्याच्यादृष्टीने पर्यटन महामंडळाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) अंशत: खरे आहे.
(२) कोकणातील पर्यटन स्थळांना जोडणाऱ्या रस्त्यांचा विकास करण्यासाठी पर्यटन विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागास व भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास विनंती केली असून यात मुंबई-गोवा महामार्गास जोडणाऱ्या कोकणातील महत्वाच्या पर्यटनस्थळांच्या जोडरस्त्यांचा समावेश आहे.
(३) केंद्रिय पर्यटन मंत्रालयामार्फत टप्प्याटप्प्याने (मंजुरीच्या २०% निधी वितरीत केला जातो.) उपलब्ध होणारा व वेळेत उपलब्ध न होणारा निधी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाऐवजी शासनाकडे (राज्याच्या एकत्रित निधीत) निधी देण्याची पध्दत सुरु केल्याने, तसेच प्रकल्पासाठी लागणाऱ्या जागा/ जमिनीसाठी सागरी किनारा क्षेत्र विनियम (CRZ), भारतीय पुरातत्व विभाग (ASI), वने यांच्या अखत्यारित मोडल्यामुळे त्यावर घ्याव्या लागणाऱ्या विविध परवानग्या यामुळे काही प्रकल्प सुरु करण्यास व काही प्रकल्पांच्या कार्यान्वयनास वेळ लागलेला आहे. या सर्व कामांसाठी परवानग्या, इत्यादी घेऊन कामे पूर्ण केली जात आहेत व निधी खर्च करण्यात येत आहे. त्यामुळे या अनुषंगाने अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) देशी पर्यटकांच्याबाबतीत राज्याचा देशात पाचवा क्रमांक असून विदेशी पर्यटकांच्याबाबतीत दुसरा क्रमांक आहे. पर्यटन वाढीचे प्रमाण देशी पर्यटकांच्याबाबत देशाचे ११.६३ असून राज्याचेही प्रमाण ११.६३ आहे. तर गुजरातमध्ये १७.३९, गोव्यात ३४.१९ आहे.
(५) राज्यातील पर्यटन विकासाकरिता राज्य शासनामार्फत प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत तसेच केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांचा नियोजनबध्द विकास करण्यासाठी जिल्हानिहाय पर्यटन बृहत् विकास आराखडा तयार करण्याचे काम महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने नियुक्त केलेल्या संस्थेमार्फत करण्यात आले आहे. संबंधित जिल्हाधिकारी यांचेमार्फत आराखडे प्राप्त झाले असून सदर आराखड्यांची महामंडळ स्तरावर छाननी करण्यात आली आहे. सदर जिल्हानिहाय पर्यटन बृहत् विकास आराखडे शासनाच्या विचाराधीन आहेत.

-----------------

## गोवर्धन (ता.जि.नाशिक) येथील कलाग्राम प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(१४) * ३०९९७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिल्लीच्या हाट बाजाराच्या धर्तीवर नाशिक जिल्ह्यातील कलाकारांना कला प्रदर्शनासाठी तसेच महिला बचत गटाच्या उत्पादनाचे प्रदर्शन व विक्रीसाठी एक कायमची बाजारपेठ असावी, यामाध्यमातून शिवारात केंद्र शासनाच्या ‘पीटीडीसी’ योजनेंतर्गत कलाग्राम प्रकल्पास मंजुरी देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कलाग्राम प्रकल्पासाठी सुमारे रुपये साडे आठ कोटींचा निधी खर्च झाला असून इमारत तयार होवून केवळ किरकोळ कामे अपूर्ण अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारत विनावापर पडून राहू नये म्हणून इमारत पूर्ण होण्याआधी दिल्ली हाटच्या धर्तीवर विविध राज्यांशी टाय-अप करुन येथे लोककला विक्री प्रदर्शन सुरु करण्यासाठी कलाग्रामचे एक्झुक्येशन प्लॅन तयार करावा, अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाशिकच्या पर्यटनास चालना मिळण्याच्यादृष्टीने रखडलेला कलाग्राम प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) व (२) होय.
(३) अंशत: खरे आहे. मा.लोकप्रतिनिधींनी अशी मागणी दिनांक २७/८/२०१६ च्या पत्रान्वये केली आहे.
(४) व (५) उर्वरित बाह्य विद्‌युतीकरण, पाणीपुरवठा, अंतर्गत सुशोभिकरण, पदपथ इत्यादी कामे PPP तत्वावर करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयाच्या वसाहतीमध्ये कर्मचाऱ्यांशिवाय अन्य नागरीक राहत असल्याबाबत

**(१५) * ३२४०८ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयाच्या वसाहतीत कर्मचाऱ्यांशिवाय अन्य नागरिक राहत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्‌नुसार घाटी रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांशिवाय अन्य नागरिक सदर निवासात राहण्यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हा शासकीय रूग्णालयाला कायमस्वरूपी भूलतज्ज्ञ मिळण्याबाबत

**(१६) * ३१४५९ श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात एकाच दिवशी १७ सर्वसामान्य गर्भवती महिला दाखल झाल्या असता काही महिलांचे सिझरिंग आवश्यक असतानाही भूलतज्ज्ञ गैरहजर असल्याने या महिलांचे जीव धोक्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हा शासकीय रूग्णालयाला गेल्या ५ वर्षापासून भूलतज्ज्ञ नसल्याने कायमस्वरूपी भूलतज्ज्ञ मिळावा यासाठी आरोग्य विभाग तसेच मा.मंत्री महोदयांकडे प्रस्ताव पाठवूनही सदर रूग्णालयासाठी कायमस्वरुपी भूलतज्ज्ञांची नियुक्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा शासकीय रूग्णालयात जिल्हयातील रूग्ण उपचारासाठी येत असून सर्वाधिक शस्त्रक्रिया जिल्हा शासकीय रूग्णालयात होत असताना, भूलतज्ज्ञ डॉक्टर केशव गुट्टे यांची पहिली नियुक्ती आरोग्य संचालनालयाने रत्नागिरी जिल्हयातील वाटद प्राथमिक आरोग्य केंद्रात केली (जेथे शस्त्रक्रिया होत नसतानाही) तर दुसरीकडे जिल्हा शासकीय रूग्णालयात यापूर्वी काम करणाऱ्या डॉ. रामचंद्र लवटे यांना दापोलीत नियुक्ती देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, रत्नागिरी जिल्हा शासकीय रूग्णालयात कायमस्वरूपी भूलतज्ज्ञ प्राधान्याने नियुक्त करण्याऐवजी अन्यत्र भूलतज्ज्ञ नियुक्त करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रत्नागिरी जिल्हा शासकीय रूग्णालयासाठी विनाविलंब भूलतज्ञांची नियुक्ती करण्यासाठी व गैरहजर राहणाऱ्या भूलतज्ञांवर कारवाई करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

दिनांक १४/०७/२०१७ रोजी जिल्हा रुग्णालयात भूलतज्ञांची नेमणूक करण्यात आली आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत भूलतज्ञांची २ पदे मंजूर असून, सदर पदावर पॅनल तयार करुन भूलतज्ञांची कॉल बेसिसवर रुग्णांना सेवा उपलब्ध करुन दिली जात आहे.

(३) व (४) डॉ. केशव गुट्टे यांनी भूलतज्ञ या विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करण्यापूर्वी त्यांची नियुक्ती प्राथमिक आरोग्य केंद्र, वाटद, जि.रत्नागिरी येथे करण्यात आली होती. तसेच डॉ. रामचंद्र लवटे यांनी पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांना उपजिल्हा रुग्णालय, दापोली, जि.रत्नागिरी येथे पदस्थापना दिली आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे-६६००) मधील भूलतज्ञांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येत आहेत. दिनांक १७/०५/२०१७ रोजी १० पदांची जाहीरात प्रसिध्द झाली आहे. लोकसेवा आयोगामार्फत प्राप्त होणाऱ्या भूलतज्ञांमधून नियुक्ती करता येईल.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे-५४००) मधील नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत मुलाखतीद्वारे भरण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केकतपांगरी साठवण तलाव (ता.गेवराई, जि.बीड) योजनेचे काम सुरु करण्याबाबत

**(१७) * ३१५४१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५९२२ ला दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केकतपांगरी साठवण तलाव (ता.गेवराई, जि.बीड) योजना दिनांक १२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाने सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुधारित प्रशासकीय मान्यता मिळूनही वर्षभरानंतरही योजनेचे काम प्रत्यक्ष सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास तसेच अनेक वेळा मा.मंत्री, जलसंधारण यांच्यासह इतर अधिकारी यांना केलेल्या पत्रव्यवहाराबाबत शासनाने चौकशी करुन सदर तालुक्यातील प्रलंबित असलेल्या योजनेचे काम सुरु करुन संपादित जमिनीचा मावेजा अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अधिक्षक अभियंता, लघुसिंचन, औरंगाबाद यांनी दिनांक ११ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता, बीड यांना तात्काळ अहवाल सादर करण्याच्या केलेल्या सूचनेवर संबधित विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) भुसंपादन मावेजा व कामाप्रित्यर्थ यासाठी लागणाऱ्या आवश्यक निधी मागणीचा प्रस्ताव दिनांक १९/०६/२०१७ रोजी क्षेत्रिय कार्यालयामार्फत महामंडळास प्राप्त झाला असून सदर निधी क्षेत्रियस्तरावर वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबेडकरनगर, कुलाबा येथील झोपडपट्टीधारकांवर नोटीस न देता कारवाई केल्याबाबत

**(१८) * ३२६८३ ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेडकरनगर, कुलाबा येथील सुमारे १५०० झोपडपट्टीधारकांवर वन विभागाने कोणतीही नोटीस न देता माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान कारवाई केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) आंबेडकरनगर-कुलाबा येथील राखीव वनावरील ५३६ अनधिकृत झोपडपट्टीधारकांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ५३ व ५४ अन्वये नोटीसा देऊन त्यांच्या सुनावण्या घेण्यात आल्या होत्या. सुनावणीअंती अतिक्रमण निष्कासन करत असताना तेथे नव्याने आढळून आलेल्या ७६० अनधिकृत झोपड्या मिळून एकूण १२९६ झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले.

(२) वन विभागाने केलेल्या सदर निष्कासनाच्या कारवाईबाबत शासनास काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रकरणी सखोल चौकशी करण्याकरिता शासन पत्र दिनांक ८/५/२०१७ नुसार विभागीय वन अधिकारी, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकणामध्ये मागेल त्याला शेततळे या योजनेंतर्गत जमीनधारणेची मर्यादा कमी केल्याबाबत

**(१९) * ३४३२६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या मागेल त्याला शेततळे या योजनेखाली कोकणामध्ये ०.६० हेक्टरवरुन ०.२० हेक्टर इतकी जमीनधारणेची मर्यादा केल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृदसंधारण संचालक यांना सन २०१७-२०१८ साठी रुपये ६३ कोटी ३३ लाख ३३ हजारचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय आहे,

(३) असल्यास, एकूण निधीपैकी किती निधी रत्नागिरी जिल्हयासाठी दिला आहे व त्यातील तालुकानिहाय किती रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे, तसेच रत्नागिरी जिल्हयामध्ये आतापर्यंत किती शेतक-यांच्या शेततळयांबाबतचे अर्ज प्राप्त झाले आहेत व त्यातील किती शेतक-यांच्या अर्जांना मंजूरी देण्यात आली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) “मागेल त्याला शेततळे” या योजनेंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये रत्नागिरी जिल्ह्यासाठी माहे एप्रिल २०१७, ते माहे जून, २०१७ या तीन महिन्यांच्या कालावधीकरीता एकूण रु. ५.७७ लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे. त्याची तालुकानिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| लांजा | - | रु. | ३८,९८०/- |
| चिपळूण | - | रु. | १,०५,९९०/- |
| देवरुख | - | रु. | १,४०,२४७/- |
| दापोली | - | रु. | १,३६,९६७/- |
| खेड | - | रु. | ३६,९३७/- |
| मंडणगड | - | रु. | १,१७,८९७/- |
| लांजा | - | रु. | ३८,९८०/- |

या योजनेंतर्गत संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्यात आजपावेतो ३६३ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी १६५ अर्जांना मंजूरी देण्यात आली आहे. तसेच, ६३ शेततळ्यांची कामे पूर्ण झाली असून, २३ कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात बालविवाह व हुंडाप्रथा थांबविण्याबाबत

**(२०) * ३२३८१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मराठवाडयात बालविवाह व हुंडाप्रथेचे प्रमाण ३० टक्के असून बीड जिल्ह्यात तसेच बीड जिल्ह्यातील शिरुर, पाटोदा, धारुर, आष्टी, वडवणी तालुक्यांमध्ये बालविवाह व हुंडाप्रथेचे प्रमाण जास्त असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्ह्यात दुष्काळ असल्याने गरीब ऊस तोडणी कामगार कामासाठी बाहेरगावी जात असल्याने लहान मुलींची लग्न केली जातात त्यामुळे सदर जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच हुंडयामुळे लातूर येथील शितल व्यंकट वायाळ हिने विहिरीत उडी मारुन आत्महत्या केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील बालविवाहाच्या प्रश्नावर अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी उच्चस्तरीय अभ्यास समिती नेमण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.कामगार मंत्री यांच्याकडे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली असून सदर निवेदनाद्वारे ऊस तोडणी कामगारांच्या कुटुंबांची माहिती घेऊन आरोग्यविषयक समस्येविषयी समुपदेशन आणि उपचार करणारी यंत्रणा राबवून, बालविवाह समस्येवर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, बालविवाह व हुंडा या कुप्रथा थांबविण्यासाठी अस्तित्वात असलेले कायदे अधिक परिणामकारक करण्यासाठी तसेच उच्चस्तरीय अभ्यास समिती नियुक्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) शितल व्यंकट वायाळ या मुलीच्या आत्महत्या प्रकरणी मुरुड पोलीस स्टेशन ता. जि. लातुर आ.मृ.नं. २१/१७, दिनांक १४/०४/२०१७ रोजी नोंद केलेली आहे. पोलीस अभिलेखानुसार सदर प्रकरणात घरातील आर्थिक परिस्थिती नाजुक असल्याने व वडीलांची शेती सतत नापीकी झाल्याने निराश होऊन सदर मुलीने आत्महत्या केल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते.

(४) हे खरे नाही.

(५) बालविवाह रोखण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शासन अधिसूचना दिनांक ०३ जून, २०१३ अन्वये ग्रामसेवक यांना त्यांच्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे व संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रात नियुक्त केलेल्या अंगणवाडी सेविका, या बालविवाह प्रतिबंधक अधिकाऱ्यास सहाय्य करतील तसेच शासन अधिसूचना दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ अन्वये बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना आपापल्या संबंधित प्रकल्प क्षेत्रावर अधिकारीता असणारे बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणुन नियुक्ती केली आहे आणि बालविवाह प्रतिबंध अधिकाऱ्याला सहाय्य करण्याकरिता संबंधित बालविकास प्रकल्प (नागरी) या अंतर्गत नेमलेल्या अंगणवाडी पर्यवेक्षिकांची देखील नियुक्ती केली आहे. तसेच यासंदर्भात उपाययोजना सुचविण्यासाठी उच्चस्तरीय अभ्यास समिती नियुक्त करण्यात आलेली नाही.

तसेच हुंडा प्रतिबंधक अधिनियमाची अंमलबजावणी होण्यासाठी शासन अधिसूचना दिनांक २५/०७/२०१६ अन्वये अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांसाठी अधिकारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. तसेच या अनुषंगाने प्रचार प्रसिध्दी व जनजागृती करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिवराबाजार, वरघाट (ता.रामटेक, जि.नागपूर) या गावांमध्ये जलयुक्त शिवार योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(२१) * ३२९०७ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवराबाजार, वरघाट (ता.रामटेक, जि.नागपूर) या गावांमध्ये जलयुक्त शिवाराची गरज असताना व त्याठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष्य असताना या गावात जलयुक्त शिवाराची कामे घेण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर गावांमध्ये जलयुक्त शिवार योजना कार्यान्वित करण्यासाठी व त्यास निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) जलयुक्त शिवार अभियान सन २०१७-१८ मध्ये नागपूर जिल्हयात जलयुक्त शिवार गाव निवड निकषानुसार निवडण्यात आलेल्या २२० गावात हिवराबाजार ता.रामटेक या गावाची निवड करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत कामाची अंदाजपत्रके तयार करणे सुरू असून प्रशासकिय मान्यतेनंतर कामे सुरू करण्यात येतील.

जलयुक्त शिवार अभियान गावनिवडीच्या निकषानुसार वरघाट या गावाची पुढील वर्षात निवडीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कात्रज, संतोषनगर व दत्तनगर (जि.पुणे) येथे प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याबाबत

**(२२) * ३२१३५ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील कात्रज, संतोषनगर, दत्तनगर या भागाचा महानगरपालिकेत समावेश होवून १९ वर्षाचा कालावधी होवूनही सदर ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राची उभारणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर भागात प्राथमिक आरोग्य केंद्र उभारणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३)
• सध्या कात्रज परिसरामध्ये एक दवाखाना कार्यरत असून तेथे बाह्यरूग्ण सेवा पुरविण्यात आली आहे. तसेच जुलै, २०१७ मध्ये कात्रज व नजिकच्या परिसरात फिरता दवाखाना कार्यान्वित करण्यात आला आहे.
• दत्तनगर, आंबेगाव येथे पुणे महानगरपालिकेच्या दवाखान्याचे बांधकाम पूर्ण झाले असून, बाह्यरूग्ण विभाग कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
• संतोषनगर मध्ये पुणे महानगरपालिकेचा दवाखाना उपलब्ध नाही. तथापि, सदर परिसर कात्रजचा एक भाग असून कात्रज परिसरातील दवाखाना तसेच फिरता दवाखाना कार्यरत असल्याने संतोषनगरकरिता त्याचा पर्यायी व्यवस्था म्हणून वापर केला जातो.
• संतोषनगर, दत्तनगर या भागात आरोग्य केंद्र उभारण्यासाठी आवश्यक जागा, आरक्षणे, आर्थिक तरतूदी यासाठी पुणे महानगरपालिकेच्या प्रशासनामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.

-----------------

## राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांनी फी वाढ केल्याबाबत

**(२३) * ३२३६५ श्री.अनिल भोसले, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे तसेच राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांनी वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी ५० लाख ते ९६ लाख इतकी भरमसाठ फी वाढ केल्याचे व खाजगी व्यावसायिक महाविद्यालयाच्या वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्याक्रमासाठी संस्थाचालकांनी व्यवस्थापन कोटयातील शुल्कात वाढ केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय महाविद्यालयांनी शुल्कात ८० टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय घेतला असून सदर फी वाढ विरोधात मा.वैद्यकिय शिक्षण मंत्री यांना माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पालकांनी लेखी निवेदनही दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी वैद्यकिय महाविद्यालयांत व्यवस्थापन कोटयासाठी शुल्कवाढीवर शासनाचे नियंत्रण नसल्याने गरीब विद्यार्थी गुणवत्ता असून देखील वाढविण्यात आलेली फी भरु शकत नसल्याने वैद्यकिय शिक्षणापासून वंचित राहू शकतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार भरमसाठ फी वाढ करणाऱ्या वैद्यकीय महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली तसेच खासगी वैद्यकीय महाविद्यालयांतील व्यवस्थापन कोटयातील शुल्कवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) वैद्यकीय महाविद्यालयातील फी वाढीच्या अनुषंगाने निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

(४) संबंधित खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयांनी व्यवस्थापन कोटयाची फी नियंत्रित आकडयापर्यंत केल्याने अशा महाविद्यालयांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लेंडी (जि.पालघर) धरणग्रस्तांचे पुनर्वसन करुन मोबदला देण्याबाबत

**(२४) * ३४२०२ श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक २७०७९ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लेंडी (जि.पालघर) धरणासाठी शासनाने शेतकऱ्यांकडून १८० हेक्टर जमीन संपादित न करता सदर धरणाचे काम पूर्ण केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेंडी धरणग्रस्तांनी याबाबत मा.मुख्यमंत्री, मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने मा.मंत्री मदत व पुनर्वसन यांनी या संदर्भात बैठक घेऊन प्रकल्पग्रस्तांना त्वरित मोबदला देण्याचे आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच या धरणाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदारास शासनाने शेतकऱ्यांचे पुनर्वसन न करता रक्कम अदा केली आहे, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करुन जमिनीचा मोबदला अदा करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

लेंडी धरणाच्या बूडीत क्षेत्राकरिता लागणाऱ्या १७३ हेक्टर क्षेत्राकरिता लोकांची लेखी संमतीपत्रे प्राप्त करून घेऊन जानेवारी, २००८ दरम्यान प्रत्यक्ष धरणाच्या कामास सुरूवात करण्यात आली आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे लेंडी धरणाचे काम सन २०११ पासून बंद ठेवण्यात आले आहे.

(२) होय.

(३) होय, मा.मंत्री, मदत व पुनर्वसन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३१/०५/२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या तक्रारीचे निवारण करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. त्यानुसार खाजगी जमीन वाटाघाटीव्दारे थेट खरेदी करणेबाबत संबंधितांकडून संमती प्राप्त करून घेणेबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(४) नाही.

प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसनास दिलेल्या लेखी संमतीस अनुसरून घरांचा मोबदला रक्कम रूपये ७४,६६,३७७/- दिनांक २२/०३/२०११ रोजी अदा करण्यात आली. तद्नंतर प्रकल्पग्रस्तांनी शासकीय पुनर्वसनाची मागणी केल्याप्रमाणे मौजे भरसटमेट येथे शासकीय पुनर्वसन करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-०३/२०१५ प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२/०५/२०१५ अन्वये प्रकल्पासाठी आवश्यक खाजगी जमीन वाटाघाटीव्दारे थेट खरेदी करण्याची कार्यवाही सुरू आहे.

मौजे भरसटमेट येथे शासकीय पुनर्वसन प्रस्तावित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोसीखुर्द (जि.भंडारा) येथील नेरला उपसा सिंचन योजनेच्या साहित्य पुरवठ्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२५) * ३२०६६ प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोसीखुर्द (जि.भंडारा) येथील उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत नेरला उपसा सिंचन योजनेच्या महाविद्युत पारेषण कंपनीच्या १३२ के.व्ही. उपकेंद्राकरीता माहे ऑक्टोबर ते नोव्हेंबर, २००९ या कालावधीत रुपये १ कोटी ९९ लाखाचे पुरवठा करारानुसार साहित्य पुरवठा न करता बनावट कागदपत्र सादर करून गैरव्यवहार केल्याचे दिनांक १५ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकारी व कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करून संबंधित अधिकारी व कंत्राटदारावर गुन्हा (एफ.आय.आर.) नोंदविण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धानोरा (जि.गडचिरोली) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात रिक्त पदे भरण्याबाबत

**(२६) * ३३९९६ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धानोरा (जि.गडचिरोली) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात दिनांक २३ एप्रिल, २०१७ रोजी मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यासाठी वैद्‌यकीय अधिकाऱ्यांची उपलब्धता नसल्याचे दिनांक २८ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धानोरा ग्रामीण रुग्णालयात वैद्‌यकीय अधिक्षक अधिकारी पद रिक्त असल्याने प्रभारी अधिकाऱ्यांकडे कार्यभार असून रुग्णांना वैद्‌यकीय सुविधा उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली जिल्हयातील धानोरा यासह अन्य तालुका मुख्यालयी वैद्‌यकीय अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे रिक्त पदांची संख्या मोठी असल्याने वैद्‌यकीय सुविधांमध्ये विलंब होत आहे, तसेच गडचिरोली जिल्हयातील रिक्त पदे स्थानिकस्तरावर भरण्यासाठी लोकप्रतिनिधींनी पत्रव्यवहार केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरुन रुग्णांची गैरसोय दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) नाही,

दिनांक २३ एप्रिल, २०१७ रोजी ग्रामीण रुग्णालय, धानोरा जि.गडचिरोली येथे शवविच्छेदन करण्याकरीता वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होते. तथापि, शवविच्छेदनासाठी सहाय्य करणारा सफाईगार वैद्यकीय रजेवर असल्याने पर्यायी व्यवस्था म्हणून सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथील सफाईगार ग्रामीण रुग्णालय, धानोरा येथे पाठविण्यात आला होता. सदरहू सफाईगार प्रवासात असताना रुग्णांच्या नातेवाईकांनी घाई केल्यामुळे ते शवविच्छेदन सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे करण्यात आले.

(२) हे अंशतः खरे आहे.

ग्रामीण रुग्णालय, धानोरा येथे वैद्यकीय अधिक्षकाचे १ पद मंजूर असून सदर रिक्त पदाचा अतिरीक्त कार्यभार तेथे कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी यांचेकडे देण्यात आलेला आहे. तथापि उपलब्ध वैद्यकीय अधिकारी कर्मचारी यांच्यामार्फत रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत असून रुग्णांची गैरसोय होऊ दिली जात नाही.

(३) व (४) मा.लोकप्रतिनिधींनी केलेला पत्रव्यवहार आरोग्य सेवा संचालनालय व शासनस्तरावर आढळून येत नाही. तथापि, वैद्यकीय अधिक्षक वर्ग-१ संवर्गाचे पद भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे. रु.५४००) संवर्गाची रिक्त पदे संबंधित जिल्हाधिकारी यांच्यामार्फत Walk in interview च्या माध्यमातून भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे. तसेच गट-क व गट-ड संवर्गाची पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोकणात धरणांची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(२७) * ३३७०८ श्री.आनंदराव पाटील** : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात ३० वर्षापूर्वी अनेक धरणे मंजूर करण्यात आली असून त्यातील बहुतेक धरणे अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लहान मोठे धरण प्रकल्प पूर्ण होण्यासाठी रुपये ३ हजार कोटींच्या निधीची गरज आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या प्रकल्पांना आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, कोकण पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत ३० वर्षापुर्वी मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पांपैकी सद्यस्थितीत २४ पाटबंधारे प्रकल्प बांधकामाधीन आहेत.
(२) सदर २४ बांधकामाधीन पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सुमारे रुपये ४१६०.५६ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.
(३) राज्यातील प्रकल्पांचा आढावा घेवून प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार आर्थिक गुंतवणूक करण्याचा निर्णय वित्त विभागाच्या श्वेतपत्रिकेमध्ये घेण्यात आलेला आहे. ज्या प्रकल्पांपासून पुढील ३ वर्षामध्ये प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकेल अशा प्रकल्पांना प्राधान्य देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मा.राज्यपाल महोदयांचे निर्देश व राज्याची अर्थोपायाची स्थिती यांना अनुसरुन वार्षिक अंदाजपत्रकात या प्रकल्पांकरिता सन २०१७-१८ करीता रुपये २८०.८१ कोटीची तरतूद करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात वन विभागाच्यावतीने वृक्ष लागवड मोहिम राबविण्यात आल्याबाबत

**(२८) * ३१२८५ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७३३४ ला दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वन विभागाच्यावतीने माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दोन कोटी वृक्ष लागवड मोहिम हाती घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मोहिमेत लावण्यात आलेल्या वृक्षांची व्यवस्थित निगा न राखल्याने सदर मोहिम अयशस्वी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एक कोटींपैकी किती वृक्षांची व्यवस्थित निगा राखण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, सदर मोहिमेवर झालेला एकूण खर्च किती व सदर मोहिमेंतर्गत दरवर्षी लावण्यात येणाऱ्या वृक्ष लागवडीच्या संवर्धनासाठी शासनाने कोणती योजना आखली वा आखण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय.
(२) हे खरे नाही.

वन विभाग, सामाजिक वनीकरण विभाग, वन विकास महामंडळ व वन्यजीव विभाग यांचेमार्फत सन २०१६ च्या पावसाळयात १ जुलै, २०१६ रोजी २.२० कोटी वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे. त्यापैकी जिवंत रोपांची टक्केवारी ८४.९६ % आहे.
(३) वन विभागामार्फत लागवड केलेल्या २२०.०३ लक्ष रोपांची निगा राखण्याची काळजी घेण्यात आली. त्यापैकी १८६.९३ लक्ष रोपे जिवंत आहेत.
(४) वन विभागाद्वारे लागवड केलेल्या रोपांची जपणूक करण्यासाठी संबंधित रोपवनाचे अंदाजपत्रकात तरतूद करण्यात येते. सदरहू अंदाजपत्रकामध्ये रोपांच्या संरक्षणासाठी रखवालदार तसेच रोपवनाचे सभोवताली जैविक कुंपण/चर व उंचवटयाची तरतूद करण्यात येते. रोपांची जपणूक व संवर्धनासाठी मनरेगा अंतर्गत कुटुंबामार्फत संरक्षण ही योजना सामाजिक वनीकरण शाखेमार्फत रस्ता दुतर्फा वृक्ष लागवडीच्या संरक्षणासाठी राबविण्यात येते. सदर मोहिमेंतर्गत मार्च, २०१७ अखेर एकूण ११३०२.११ लक्ष खर्च झालेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे रुग्णांची शस्त्रक्रिया करीत नसल्याबाबत

**(२९) * ३३१२१ श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये (मेडीकल) रुग्णांना उपाशीपोटी शस्त्रक्रियेसाठी आणले जाते व बराच वेळ बसवून आज शस्त्रक्रिया होणार नाही म्हणून परत पाठविले जात असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णाला दोन दिवस उपाशी ठेवूनही शस्त्रक्रिया करण्यात येत नाही व उक्त शस्त्रक्रिया टाळण्याचे कारणही रुग्णांना सांगण्यात येत नाही, हे ही खरे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३०) * ३२१७६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली, खेड व मंडणगड (जि.रत्नागिरी) याठिकाणी शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेत रुपये १० कोटीचा गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजनेची कामे फक्त कागदोपत्री असून त्याची देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलयुक्त शिवार योजनेच्या झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करुन या प्रकरणात दोषी असलेल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे,
(४) तसेच राज्यात संरक्षित सिंचनाची व्यवस्था मोठ्या प्रमाणावर वाढविण्यासाठी कालबध्द नियोजन जल आराखडा तयार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) नाही.

मात्र, प्राथमिक चौकशीमध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील जलयुक्त शिवार अभियान योजनेमधील खेड तालुक्यातील मौजे निळवणे येथील सिमेंट नाला बंधारा गट क्र.१/३ व वळण बंधारा गट क्र.१/७ ही दोन कामे अपेक्षित दर्जाची नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) नाही.
(३) जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेमार्फत समिती नेमण्यात येऊन प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार, तत्का.कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक यांच्याविरूद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ चे नियम ४(१)(अ) मधील तरतूदीनुसार निलंबनाची कारवाई विभागीय कृषी सहसंचालक कोकण विभाग, ठाणे यांचेमार्फत करण्यात आली आहे. तसेच, विभागीय दक्षता पथकामार्फत स्वतंत्रपणे चौकशी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, पोलिस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी यांचेमार्फतही चौकशी करण्यात येत आहे.
(४) एकात्मिक राज्य जल आराखडा माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत तयार करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील विन्हेरे पंचक्रोशीतील झोलाई देवस्थानास पर्यटन दर्जा देण्याबाबत

**(३१) * ३३१९५ श्री.प्रविण दरेकर** : सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील विन्हेरे पंचक्रोशीतील झोलाई देवस्थानास पर्यटन दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.पर्यटन मंत्री यांना पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू झोलाई देवस्थानास पर्यटन दर्जा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१), (२), (३) व (४) मा.लोकप्रतिनिधींचे दिनांक ३०/३/२०१७ चे प्रश्नोक्त भाग (२) मध्ये नमूद केलेले प्रश्नाधीन स्थळास पर्यटनाचा दर्जा देण्याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे पाठविण्यात आले आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, रायगड यांनी सदर झोलाई देवस्थानास तिर्थक्षेत्र व पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून मागविला आहे. सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, रायगड यांना प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून पर्यटनस्थळाचा दर्जा देण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील पंचायत समितीच्या इमारतीचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(३२) * ३०९२२ श्री.नारायण राणे** : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैभववाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील पंचायत समितीच्या इमारतीच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाची चौकशी करण्यासाठी नियुक्त केलेल्या मालवण पॉलिटेक्निकल कॉलेजच्या प्राचार्यांच्या समितीने चुकीचा अहवाल शासनास

सादर केला असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामाकरीता रूपये २ कोटी ५२ लाखांचा खर्च करूनही सदर इमारतीला जागोजागी भेगा पडल्या असून पहिल्याच पावसात इमारतीला गळती लागली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

सदर इमारतीचे काम प्रगतीपथावर आहे. इमारतीस कोठेही भेगा पडलेल्या नाहीत. मात्र, एक्स्पान्शन जॉईंट (Expansion Joint) मधून पाण्याची गळती होत असून त्यावर उपाययोजना करुन घेण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिमानदीवरील (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) बंधाऱ्यांना दरवाजे बसविणेबाबत

**(३३) * ३३८१८ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर तालुक्यातील (जि.सोलापूर) भीमा नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे दरवाजे जीर्ण झाल्याने त्यांची दूरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्यास नवीन दरवाजे बसविणेबाबत स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधीकडून शासनाकडे मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भीमा नदीवरील बंधाऱ्यांना दरवाजे बसविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, अंशत: खरे आहे. सदर ठिकाणचे काही बर्गे जीर्ण झालेले असल्याने त्यांना दुरुस्तीची आवश्यकता आहे.
(२) मा.ना.श्री विजयकुमार देशमुख, पालकमंत्री, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी संचालक, मकृखोविम, पुणे यांचे उपस्थितीत दिनांक १२/०८/२०१६ रोजी सोलापूर येथे झालेल्या बैठकीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी सोलापूर जिल्ह्यातील सर्व कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांसाठी नविन बर्गे खरेदी करणेबाबत मागणी केली होती.
(३) पंढरपूर तालुक्यातील पिराची कुरोली, गुरसाळे, मुंढेवाडी व पुळूज या ४ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांस आतापर्यंत यांत्रिकी विभागाकडून नविन १४०४ बर्गे प्राप्त झालेले आहेत. उर्वरीत ९५३ नविन बर्गे खरेदी करण्यासाठी रुपये ४.०० कोटी निधी उपलब्ध करून दिला असून त्यांतर्गत नवीन बर्गे बसविण्याची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राधानगरी, भुदरगड, गगनबावडा, आजरा, चंदगड, शाहूवाडी, पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यात वन्य प्राण्यांकडून शेतपिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(३४) * ३११२७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी, भुदरगड, गगनबावडा, आजरा, चंदगड, शाहूवाडी, पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील शेतपिकांचे वन्य प्राण्यांकडून मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शेती क्षेत्रातील पीक नुकसानीचा विमा योजनेत सहभाग करावा अशी शेतकऱ्यांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वन्य प्राण्यांकडून नुकसान होणाऱ्या पिकांचा विमा योजनेत समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) राधानगरी, भुदरगड, गगनबावडा, आजरा, चंदगड, शाहूवाडी, पन्हाळा या तालुक्यात वन्यप्राण्यांनी शेतपिकांचे नूकसान केल्या प्रकरणी प्रचलित शासन निर्णयातील तरतूदींच्या अधीन राहून संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यास नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रधानमंत्री पीक विमा योजना ही केंद्र शासनाची योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात राबविण्यात येत आहे. सदर मार्गदर्शक सुचनांनूसार वन्यप्राण्यांकडून होणाऱ्या पीक नुकसानीस प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत विमा संरक्षण देण्यात येत नाही.

वन्य प्राण्यांकडून होणाऱ्या पीक नुकसानीबाबतच्या जोखिमेस विमा संरक्षण देण्याची बाब धोरणात्मक असून या संदर्भात केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्र शासनाकडून बदल होणे आवश्यक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## करडी पालोरा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथे पंतप्रधान आवास योजनेतील पात्र लाभार्थींच्या याद्यांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३५) * ३२९६१ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालोरा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील भूमिहीन व गरजू लाभार्थी तसेच अनेकांना बऱ्याच वर्षापासून पंतप्रधान आवास योजनेपासून वंचित ठेवण्यात आल्याची बाब माहे मे, २०१७ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच करडी पालोरा येथे पंतप्रधान आवास योजनेतील पात्र लाभार्थींच्या याद्यांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी गैरव्यवहार केल्याने गरजू, निराधार व बेघर लोकांची नांवे यादीतून जाणीवपूर्वक वगळण्यात आल्याची बाब माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा जिल्हयात सदरहू अनेक कुटुंबांना योजनेपासून वंचित ठेवल्यामुळे त्यांना अनेक वर्षापासून पडक्या घरावर ताडपत्री लावून वा उघड्यावर राहून हलाखीचे जीवन जगावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अनेक वेळा निवेदन, लेखी तक्रार देऊनही अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नसल्याने उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गरजू लाभार्थींना पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

तथापि, प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्रतिक्षा यादीतील पात्र लाभार्थ्यांना प्राधान्यक्रमानुसार लाभ देण्यात येत आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जायकवाडी प्रकल्पातील समन्यायी तत्त्वानुसार समान पाणीवाटप योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(३६) * ३३६१० श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १४ वर्षापासून प्रलंबित असलेल्या जायकवाडी पाणी समस्या प्रकरणी जुन्या कायद्यानुसार पाण्याचा कोटा ठरवून देणारी ‘ब्लॉक’ म्हणजेच कोटा पध्दत बंद करताना नव्या जलसंपदा प्राधिकरण कायद्यानुसार समन्यायी तत्त्वानुसार समान पाणीवाटप योजना आराखडा तयार करण्याचे मा.उच्च न्यायालयाने आदेश देऊनही शासनाने कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने समान पाणीवाटप योजना कार्यान्वित करण्यास झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणात मा.न्यायालयाच्या आदेशाचा अवमान विचारात घेता माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.उच्च न्यायालयाने शासनावर गंभीर ताशेरे ओढूनही शासनाने कोणती कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१), (२) व (३) उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील समन्यायी पाणीवाटपाच्या कार्यवाहीसाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दिनांक १९ सप्टेंबर २०१४ चा निवाडा दिला आहे. या निवाड्यानुसार दरवर्षी उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील प्रकल्पांतर्गत दिनांक १५/१० रोजीच्या पाणीसाठ्याचा आढावा घेऊन आवश्यकता भासल्यास उर्ध्व प्रकल्पांतून जायकवाडी प्रकल्पाच्या पैठण येथील जलशयात पाणी सोडण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार सन २०१४ मध्ये ७.१३ अ.घ.फू. व सन २०१५ मध्ये १०.४० अ.घ.फू. पाणी सोडण्यात आलेले आहे.

या विषयासंदर्भात मा.उच्च न्यायालयाकडे दाखल झालेल्या विविध याचिकांच्या अनुषंगाने दिनांक २३/०९/२०१६ रोजी अंतिम निवाडा दिलेला असून त्यामधील परिच्छेद क्र. १९७ (क) अन्वये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा दिनांक १९ सप्टेंबर २०१४ चा निवाडा वैध असल्याचा निर्वाळा दिला आहे. तथापि ‘मुंबई कालवा नियम १९३४’ मधील तरतूदीनुसार राज्यात सिंचन प्रकल्पांवर सध्या अस्तित्वात असलेल्या पीक समुह सिंचन प्रणाली (Block Irrigation System) साठी पाणीपुरवठा करण्याची बाब चुकीची असल्याचा निर्वाळा दिला आहे.

या निवाड्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश क्षेत्रियस्तरावर देण्यात आलेले आहेत. सदरील न्यायनिवाडा झाल्यानंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण दिनांक १९/०९/२०१४ च्या निवाडयातील तरतूदीप्रमाणे समन्यायी पाणीवाटपाची कार्यवाही करण्याची आवश्यकता सन २०१६ मध्ये भासली नाही.

मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या दिनांक १९/०४/२०१७ च्या आदेशामध्ये गोदावरी जल आराखडा तसेच राज्य जल आराखडाच्या अनुषंगाने नमुद केलेल्या सूचनांच्या अनुषंगाने सद्य:स्थितीत गोदावरी जल आराखडा शासनास दिनांक १३/०७/२०१७ रोजी प्राप्त झाला असुन त्यास राज्य जल मंडळ व राज्य जल परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याचप्रमाणे राज्यातील इतर नदीखोऱ्यांचा जल आराखडा तयार करुन राज्याचा एकात्मिक जल आराखडा जलदगतीने तयार करुन त्यास शासनस्तरावरुन राज्य जल मंडळ व राज्य जल परिषदेची मान्यता देऊन त्यातील तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयात कुपोषण निर्मूलनासाठी 'टेक होम रेशन' योजनेंतर्गत (टीएचआर) निकृष्ट दर्जाचा आहार पुरविल्याबाबत

**(३७) * ३०९२३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयात आदिवासी भागात कुपोषण निर्मूलनासाठी केंद्र शासनाच्या महिला व बालविकास विभागातर्फे सुमारे अडीच हजार अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून `टेक होम रेशन' योजनेंतर्गत (टीएचआर) गर्भवती, स्तनदा माता तसेच तीन वर्षापर्यंतच्या बालकांना लाभार्थींच्या संख्येप्रमाणे सुकडी, शिरा, उपमा या पौष्टिक पोषण आहाराची पाकिटे पुरविण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंगणवाड्यांना पुरविण्यात आलेली पाकिटे निकृष्ट दर्जाची असल्याने कचऱ्यात टाकली जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पौष्टिक आहार (टीएचआर) पाकिटाच्या दर्जाबाबत संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे स्थानिक नागरिकांनी, संस्था व श्रमजीवी संघटनेचे संस्थापक यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान तक्रारी दाखल करुन निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) माहे एप्रिल, २०१७ मध्ये श्रमजीवी, कामगार रयत संघटनामार्फत निवेदन सादर करण्यात आलेले आहे. सदर निवेदनामध्ये विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये एक मुद्दा अंगणवाडयांमध्ये दिला जाणारा निकृष्ट दर्जाचा टिएचआर (टेक होम रेशन) पूर्णपणे बंद करण्यात यावा असा आहे. THR बाबत याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत.

(४) एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असून यात ६ महिने ते ३ वर्षाची बालके व गर्भवती, स्तनदा माता यांना केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनानुसार THR आहार देण्यात येतो. या योजनेमध्ये केंद्र व राज्य शासनाचा खर्चाचा हिस्सा ५०-५०% आहे. त्यामुळे राज्य शासनाला THR बंद करता येणार नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, परभणी यांनी वित्तीय मर्यादा डावलून गैरव्यवहार केल्याबाबत

**(३८) * ३३८३२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय निवासस्थान व दालन यांच्या किरकोळ दुरूस्तीसाठी रुपये ३१ लाखांचा खर्च करून वित्तीय मर्यादा डावलणे, वरिष्ठ कार्यालयाची पूर्व परवानगी न घेणे व इतर नियमभंग केल्यावरून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी व इतरांची वरिष्ठस्तरावरून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे माहे जून-जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे ९ मुद्यांची सविस्तर चौकशी करून संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत मुख्य सचिव यांच्यास्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) या प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद कार्यालयातील अप्पर आयुक्त आणि उप आयुक्त (आस्थापना) यांची दिनांक २१/७/२०१७ च्या पत्रान्वये चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्याकडून चौकशी अहवाल प्राप्त होताच नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात डॉक्टरांचे संरक्षण, गाऱ्हाणी व संप याकरीता उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत

**(३९) * ३१३२० आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात धुळे, ठाणे शासकीय रुग्णालयात डॉक्टरांना मारहाणीच्या घटनेनंतर मुंबईसह राज्यातील सर्व रुग्णालयातील डॉक्टरांचे संरक्षण करण्यासाठी तसेच त्यांची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी व भविष्यात त्यांच्याकडून संप करण्यात येवू नयेत यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची सूचना मा.उच्च न्यायालयाने शासनाला केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या या सूचनेनुसार शासनाने सदर उच्चस्तरीय समिती स्थापन करुन सदर समितीच्या अहवालातील शिफारशींची तात्काळ अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशांप्रमाणे उच्च स्तरीय समिती गठीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात वीरशैव लिंगायत समाजाला स्मशानभूमी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४०) * ३०९७५ ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वीरशैव लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीची गरज लक्षात घेता, ग्रामविकास विभागाने दिनांक ९ फेब्रुवारी, २००९ रोजीच्या आदेशान्वये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना वीरशैव समाजासाठी गाव तेथे स्मशानभूमी उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश निर्गमित केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बऱ्याच गावांमध्ये तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी वीरशैव लिंगायत समाजासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वीरशैव लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशतः खरे आहे,
विभागाने दिनांक ९/०२/२००१ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असे आदेश दिलेले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) याबाबत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धडगाव (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) आदिवासी दुर्गम भागातील आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४१) * ३४२१५ श्रीमती स्मिता वाघ : तारांकित प्रश्न क्रमांक २७७५८ ला दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धडगाव (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) आदिवासी दुर्गम भागातील आरोग्य विभागातील ३५० पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पदे तात्काळ भरण्याचे आदेश देवूनही अद्यापपर्यंत पदे भरली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत** : (१) हे अंशत: खरे आहे.

नंदुरबार जिल्हयातील आदिवासी दुर्गम भागातील धडगांव तालुक्यात १ ग्रामीण रुग्णालय व १३ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत.

ग्रामीण रुग्णालय, धडगांव येथे गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण ३७ पदे मंजूर असून १७ पदे भरलेली व २० पदे रिक्त आहेत. तसेच धडगांव तालुक्यात कार्यान्वित असलेल्या १३ प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये गट-अ ते गट-ड संवर्गाची एकूण १९६ पदे मंजूर असून १८८ पदे भरलेली व ८ पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) वैद्यकीय अधिक्षक संवर्गाची रिक्त पदे शासनस्तरावरुन भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. शासन परिपत्रक दिनांक २४/०६/२०१६ अन्वये जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीमार्फत नियमित वैद्यकीय अधिकारी यांची पदे मुलाखतीद्वारे भरण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार वैद्यकीय अधिकारी यांची रिक्त पदे भरणेबाबत जिल्हास्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच बंधपत्रित उमेदवारांमधून वैद्यकीय अधिकारी संवर्गाची रिक्त पदे भरणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत गट-क व गट-ड संवर्गासाठी लेखीपरिक्षा घेण्यात आल्या असून रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील पश्चिम घाट विकास कार्यक्रम योजनेसाठी देण्यात येणारा निधी निती आयोगाकडून बंद करण्यात आल्याबाबत**

**(४२) * ३२५११ श्री.जयंत पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील डोंगराळ भागाचा विकास साधण्यासाठी पश्चिम घाट विकास कार्यक्रम योजनेतून निधी उपलब्ध करण्यात येत होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून ९० टक्के तर राज्य शासनाकडून १० टक्के निधीची तरतूद करण्यात येत होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून वितरित होणारा ९० टक्के निधी केंद्र शासनाच्या निती आयोगाने पूर्णपणे बंद केल्यामुळे ही योजना निधी अभावी बंद करावी लागल्याने १२ जिल्हयातील ६३ तालुक्याचे त्यामुळे नुकसान होणार आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने राज्यातील डोंगराळ भागाच्या विकासासाठी कोणती पर्यायी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच उक्त योजनेसाठी केंद्र शासनाकडून मिळणारा निधी पूर्ववत मिळण्यासाठी शासनाने कोणते प्रयत्न केले वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) “पश्चिम घाट विकास कार्यक्रम” ही केंद्र पुरस्कृत योजना सन १९७४-७५ पासून सुरु करण्यात आली होती. सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून ९० % व राज्य शासनाचा १०% निधी प्राप्त होत होता. सदर योजना सन २०१५-१६ पासून केंद्र शासनाकडून बंद करण्यात आली आहे. ही योजना बंद करण्याबाबतचे औपचारिक आदेश नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच सदर योजना बंद केल्यामुळे संबंधित भागाचे नुकसान झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले नाही.

(४) पश्चिम घाट विकास कार्यक्रम या योजनेकरीता पर्यायी योजना करण्यात आलेली नाही. तथापि राज्यात यापूर्वी डोंगराळ भागाच्या विकासासाठी सन १९९१-९२ पासून “डोंगरी विभाग विकास कार्यक्रम” राबविण्यात येत असून सद्य:स्थितीत २२ जिल्हयातील ७३ “पूर्णगट डोंगरी तालुके” व ३५ “उपगट डोंगरी तालुके” डोंगरी विभाग विकास कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आले आहेत.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इगतपुरी व त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील पर्यटन विकासासाठी निधी मंजूर करण्याबाबत

**(४३) * ३२०७४ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुणे, नाशिक, धुळे, औरंगाबाद, कोल्हापूर व गडचिरोली या सहा वनवृत्तातील पर्यटन स्थळांचा ''इको टुरिझम'' योजनेंतर्गत विकास करण्याकरिता रूपये ८ कोटी ३५ लाख २८ हजाराचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्यटन विकासासाठी या वर्षी नाशिक विभागाला रुपये ३३ कोटी ६८ लाखाचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक विभागात अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत नाशिक जिल्ह्यातील अवघ्या दोन प्रकल्पांचा समावेश पर्यटन विकासात करण्यात येवून त्याकरिता रुपये १ कोटी ४२ लाखाचा निधी मंजूर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाशिक विभागास जिल्ह्यानुसार मंजुर निधीपैकी जळगांव रुपये १ कोटी, नंदुरबार रुपये ३ कोटी १५ लाख, धुळे रुपये १ कोटी ८० लाख, अहमदनगर रुपये २ कोटी ८५ लाख व नाशिक जिल्ह्यातील दोन तिर्थक्षेत्राच्या प्रकल्पांना पर्यटन विकासासाठी फक्त रूपये ५० लाखाचा निधी वितरीत करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी व त्र्यंबकेश्वर येथील पर्यटन स्थळाचा विकास करणेबाबत प्रदिर्घ काळापासून शासनाकडे मागणी करण्यात येवूनही नाशिक जिल्ह्यास अतिरिक्त निधी मंजूर केलेला नाही, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इगतपुरी व त्र्यंबकेश्वर येथील पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी अतिरिक्त निधी मंजुर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) निसर्ग पर्यटन योजनेंतर्गत विकास कामांकरीता सन २०१७-१८ मध्ये पुणे, नाशिक, धुळे, औरंगाबाद, कोल्हापूर व गडचिरोली या ६ वनवृत्ताकरिता जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रुपये ६८३.०० लक्ष व राज्य वार्षिक योजनेंतर्गत रुपये १३३७.८२ लक्ष असा एकूण रुपये २०२०.८२ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.
(२) निसर्ग पर्यटन योजनेंतर्गत विकास कामांकरीता सन २०१७-१८ मध्ये नाशिक विभागातील नाशिक वनवृत्तासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रुपये १०३.०० लक्ष व राज्य वार्षिक योजनेंतर्गत रुपये ४७९.०६ लक्ष असा एकूण रुपये ५८२.०० लक्ष व धुळे वनवृत्तासाठी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रुपये ५८०.०० लक्ष व राज्य वार्षिक योजनेंतर्गत रुपये २५.०० लक्ष असा एकूण रुपये ६०५.०० निधी मंजूर करण्यात आला आहे. पर्यटन विकासासाठी या वर्षी नाशिक विभागासाठी एकूण रुपये ११८७.०० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

(३) सन २०१७-१८ मध्ये निसर्ग पर्यटन योजनेंतर्गत नाशिक जिल्हयास जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रुपये ६८.०० लक्ष व राज्य वार्षिक योजनेंतर्गत रुपये ३६७.२२ लक्ष असा एकूण रुपये ४३५.२२ लक्ष निधी मंजूर करण्यात आला आहे.

(४) निसर्ग पर्यटन योजनेंतर्गत विकास कामांकरीता सन २०१७-१८ मध्ये नाशिक विभागात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत व राज्य वार्षिक योजनेंतर्गत मिळून एकूण खालीलप्रमाणे जिल्हानिहाय निधी मंजूर करण्यात आला आहे.

| **जिल्हा** | **मंजूर निधी** |
|---|---|
| नाशिक | ४३५.२२ लक्ष |
| अहमदनगर | १४६.८४ लक्ष |
| धुळे | २८०.०० लक्ष |
| नंदुरबार | २५.०० लक्ष |
| जळगाव | ३००.०० लक्ष |

(५) नाशिक जिल्हयातील इगतपूरी व त्र्यंबकेश्वर येथे सन २०१२-१३ ते सन २०१५-१६ या कालावधीत एकूण रुपये ६४२.५२ लक्षची पर्यटन विकासाची कामे करण्यात आली आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जिल्हा परिषदेंतर्गत कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गृह बांधणी/गृह खरेदी "अग्रिम मंजुरी" मिळणेबाबत

**(४४) * ३४१७६ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक १८६४९ ला दिनांक २२ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, जिल्हा शाखा अकोला यांनी व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अकोला यांनी दिनांक २५ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास जिल्हा परिषदेंतर्गत कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गृह बांधणी/ गृह खरेदी "अग्रिम मंजुरी" मिळणेबाबत शालेय शिक्षण विभागाला निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामविकास व जलसंधारण विभागाने क्र.बी.जी.टी. २०१४/प्रा.क्र.२७/वित्त-१, दिनांक ०७/०७/२०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना शिक्षक कर्मचाऱ्यांना घर बांधणी अग्रिम देण्यासाठी कर्ज व आगाऊ रकमा म्हणून अनुदान मंजूर करता येणार नाही असे पत्राद्वारे कळविले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वेतनाचे लेखाशिर्षक वेगळे व घर बांधणी कर्ज, अग्रिमे (योजनेत्तर) लेखाशीर्षक असून त्यांनी केलेली मागणी अमान्य केली आहे, हे सुद्धा खरे आहे काय,
(४) नसल्यास, शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांची मुलभूत गरज भागविण्याकरिता त्यांना विविध पतसंस्थाकडून अथवा महागड्या व्याज घेणाऱ्यांकडून कर्ज/अग्रिमे घेवून गृहबांधणी/गृह खरेदीकरीता कर्ज घ्यावे लागतात, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकवर्गीय कर्मचाऱ्यांना मुलभूत गरज असलेल्या निवाऱ्याबाबत गृह बांधणी/गृह खरेदी अग्रिम मंजुरीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२), (३) व (४) होय, हे खरे आहे.
(५) व (६) जिल्हा परिषदेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ज्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडून वेतनाचे अनुदान वितरित करण्यात येते त्या प्रशासकीय विभागाने त्यांना घर बांधणी अग्रिम देणे आवश्यक आहे. याबाबतची पुढील कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

-----------------

## दहेगाव (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथील रामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजना सुरु करण्याबाबत

**(४५) * ३२१७२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २८८८८ ला दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहेगाव (ता.वैजापूर, जि.औरंगाबाद) येथील रामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजना ताब्यात घेऊन ती सुरु करण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २० वर्षापासून बंद असलेली योजना पूर्ववत सुरु झाल्यास १८ गावातील सिंचन क्षेत्रासह ५० गावातील पिण्याच्या पाण्याची सोय होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ३ मे, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार संबंधित विभागाने प्रस्ताव शासनाकडे दिला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजना सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
याबाबत अद्याप निर्णय झाला नाही.
(२) रामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजनेच्या लाभक्षेत्रात सिंचनाचा लाभ अपेक्षित असून पिण्यासाठी पाणी पुरवठ्याची तरतूद नाही. तथापि, योजना सुरु झाल्यास काही प्रमाणात पिण्याच्या पाण्याची अप्रत्यक्षपणे सोय होवू शकेल.
(३) व (४) दिनांक ३ मे, २०१६ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत धुळे जिल्हयातील ८ व नंदूरबार जिल्हयातील १४ राज्यस्तर सहकारी उपसा सिंचन योजनांच्या विशेष दुरुस्ती कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय झाला. त्या निर्णयातील मुद्दा क्र. ३ च्या अनुषंगाने राज्यातील बंद पडलेल्या सहकारी उपसा सिंचन योजना पुर्नस्थापित करण्यासाठी क्षेत्रियस्तरावरुन माहिती गोळा करण्याची कार्यवाही चालू आहे. सदर माहिती प्राप्त होताच धोरणात्मक निर्णयास्तव मा. मंत्रीमंडळ बैठकीत सादर करणे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुटीर रुग्णालय (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील जनरेटर बंद अवस्थेत असल्याबाबत

**(४६) * ३१५०९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंतवाडी तालुका (जि.सिंधुदुर्ग) येथील कुटीर रुग्णालयातील जनरेटर काही महिन्यांपासून बंद असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे रुग्णालयातील रुग्णांना सेवा देत असताना कर्मचारी व डॉक्टरांना मेणबत्तीच्या मंद उजेडात काम करावे लागत असून प्रसूती विभागातही गंभीर समस्या निर्माण झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील एकमेव अशा रुग्णालयात अपुरे तज्ञ डॉक्टर, नर्स, कर्मचारी वर्ग, अपुरा औषध पुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिंधुदुर्ग जिल्हयामधील ग्रामीण भागातील गरीब व गरजू रुग्णांना शासकीय रुग्णालयात अद्यावत सेवा पुरविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग येथील १५ वर्षापूर्वीचा जुना जनरेटर नादुरुस्त झाल्याने नवीन ५० के.व्ही. क्षमतेचा जनरेटर सेट सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दिनांक ०७/०१/२०१७ रोजी बसविण्यात आला आहे. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.
(३) व (४) अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालयासाठी १०० खाटांच्या निकषाप्रमाणे ९४ पदे व १ नेत्र चिकित्सा अधिकारी अशी एकूण ९५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ६५ पदे भरलेली आहेत. ३० पदे रिक्त आहेत. नियमित पध्दतीने रुग्णालयात १ स्त्रीरोगतज्ञ, १ बालरोगतज्ञ, १ फिजिशियन उपलब्ध आहेत आणि

आयपीएचएस योजनेंतर्गत २ नेफ्रोलॉजिस्ट, १ अस्थिरोगतज्ञ, २ भूलतज्ञ कार्यरत आहेत. सहाय्यक अधिसेविकेचे १ पद, परिसेविकांची ६ पदे आणि अधिपरिचारीकांची ३० पैकी ३ पदे रिक्त आहेत. उपरोक्त रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. रुग्णालयामध्ये स्त्रीरोग, बालरोग, अस्थिरोग इ. रुग्णसेवा उपलब्ध असून याबरोबरच आय.सी.यू., डायलेसिस, रक्तपेढी इत्यादी सेवा देण्यात येतात. रुग्णालयात औषध साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोहिदेतर्फे शहादा (ता.शहादा, जि.नंदुरबार) येथील अंगणवाडीत बालकांना दिला जाणारा पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याबाबत

**(४७) * ३३७६९ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहिदेतर्फे शहादा (ता.शहादा, जि.नंदुरबार) येथील अंगणवाडीत बालकांना दिला जाणारा पोषण आहार (शेवया) निकृष्ट दर्जाचा असल्याने बालकांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अंगणवाडीला पोषण आहाराचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, अंगणवाडीतील पोषण आहाराची विशेष मोहिम राबवून तपासणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती नवापूर यांनी अंगणवाडीत बालकांना दिला जाणाऱ्या पोषण आहाराचे (शेवया) नमुने NABL प्राप्त प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले आहेत. तसेच या शेवया खाण्यास योग्य असल्याबाबतचा प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त होईपर्यंत अंगणवाडयांमधील शेवया या पोषण आहाराचे लाभार्थ्यांना वाटप करण्याचे थांबविण्यात आले आहे. यापुर्वी लाभार्थ्यांना वाटप झालेल्या पोषण आहाराला (शेवया) खाण्यापासून थांबविण्याच्या सूचना उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांनी दिलेल्या आहेत.

या पोषण आहाराचे पुरवठाधारक (महाराष्ट्र महिला गृह उद्योग औद्योगिक सहकारी संस्था, धुळे) यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) अंगणवाडीतील लाभार्थ्यांना वाटप करावयाच्या पोषण आहाराचे दर महिन्याला रँडम पध्दतीने सँम्पल घेण्याबाबत व ज्या जिल्हयात THR पुरवठयाबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची तात्काळ चौकशी करुन त्या आहाराचे नमूने ताब्यात घेण्याबाबत सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक), जिल्हा परिषद यांना आयुक्त एबाविसेयो, नवी मुंबई यांनी दिनांक १०/७/२०१७ च्या पत्राने सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयात सिंचन विहिरींचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(४८) * ३३२१३ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयात सिंचन सुविधा वाढविण्याच्यादृष्टीने सर्वाधिक ४५०० सिंचन विहिरी बांधून देण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले असून, सदर काम संथगतीने सुरु असल्यामुळे आजपर्यंत केवळ ५८६ विहिरींचे बांधकाम पूर्णत्वास जाणार असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिंचन विहिरींचे काम संथगतीने करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व उर्वरित सिंचन विहिरीचे बांधकाम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णयाप्रमाणे गडचिरोली जिल्हयाला ४५०० सिंचन विहिरींचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी दिनांक १० जुलै, २०१७ पर्यंत एकूण २५५५ विहिरी सुरु केलेल्या असून ९३९ सिंचन विहिरींचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.
(२) व (३) गडचिरोली जिल्हयात सिंचन विहिर बांधकामाकरिता पुरेसे कुशल मजूर उपलब्ध न होणे, विहिरीच्या खोदकामाकरिता पुरेशी यंत्रसामुग्री उपलब्ध नसणे तसेच भौगोलिक परिस्थितीमुळे विहिर बांधकामाकरिता लागणारे साहित्य वेळेवर उपलब्ध होत नसल्यामुळे कामे करण्यास विलंब होत आहे.

तथापि, मंजूर ४५०० विहिरींचे उद्दीष्ट दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## देवळा (बु.) (ता.वडवणी, जि.बीड) येथील बंद असलेले आरोग्य उपकेंद्र सुरु करण्याबाबत

**(४९) * ३३९८१ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवळा (बु.) (ता.वडवणी, जि.बीड) येथील आरोग्य उपकेंद्र गेल्या सहा महिन्यांपासून बंद असल्यामुळे परिसरातील सुमारे १० ते १२ खेडयातील नागरिकांना आरोग्य सेवा मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आरोग्य उपकेंद्र सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे खरे नाही.

देवळा आरोग्य उपकेंद्र हे प्राथमिक आरोग्य केंद्र, वडवणींतर्गत येते. देवळा उपकेंद्रांतर्गत एकूण सात गावांचा समावेश असून या सात गावांतील नागरिकांना नियमित आरोग्य सेवा पुरविल्या जातात. त्यामुळे तेथील नागरिकांची गैरसोय होत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात १७ टक्केच शेती सिंचनाखाली आल्याबाबत

**(५०) * ३१०७१ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ या आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात फक्त १७ टक्केच शेती सिंचनाखाली असल्याचे व ८३ टक्के जमीन अद्याप कोरडवाहू असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी आत्महत्यामुळे जिल्ह्याची ओळख झाल्याने त्यास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने धडक सिंचन विहिरी योजना, शेततळे, जलयुक्त शिवार योजना आखूनसुध्दा केवळ १७ टक्केच शेती सिंचनाखाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्ह्यातील प्रकल्पातून सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देणे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

धडक सिंचन विहीरी कार्यक्रमांतर्गत १०४२४ विहीरी पूर्ण करण्यात आल्या असून अंदाजे १५००० हेक्टर सिंचन होत आहे. तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ७०५९ विहीरींची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

"मागेल त्याला शेततळे" योजनेंतर्गत यवतमाळ जिल्हयात आतापर्यंत १६४९ कामे पूर्ण झाली आहेत. तसेच जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये विविध उपचार कामांमुळे संरक्षित सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील शाळांची दुरुस्ती निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(५१) * ३२५०० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील शाळांची दुरुस्ती निधीअभावी प्रलंबित असून जिल्हा परिषदेच्या ७०१ शाळांच्या इमारती दुरुस्तीच्या प्रतिक्षेत असल्याचे दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या शाळांची अवस्था धोकादायक होत असून काही शाळा अनेक वर्षापासून दुरुस्तीअभावी मोडकळीस आल्या आहेत, दरवर्षी सातत्याने शाळांच्या दुरुस्तीची मागणी होत असूनही अद्यापपर्यंत त्यांची दुरुस्ती झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शाळा तातडीने दुरुस्त करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

- जिल्हा परिषद रत्नागिरी अंतर्गत २७०४ प्राथमिक शाळांपैकी ७०१ शाळा दुरुस्तीचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

- जिल्हा वार्षिक योजनांतर्गत सन २०१६-१७ व सन २०१७-१८ मध्ये अनुक्रमे १०९ आणि १२२ अशा एकूण २३१ शाळा दुरुस्तीसाठी रुपये ३६० लक्ष इतका निधी मंजूर केलेला आहे.
- सन २०१६-१७ मध्ये जिल्हा परिषद सेस फंडातून २१ शाळा दुरुस्तीसाठी एकूण रुपये ३०.५० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे.
- सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २०१६-१७ मध्ये १६ शाळा दुरुस्तीच्या कामासाठी रुपये ३०.८३ लक्ष आणि सन २०१७-१८ मध्ये १४ शाळांसाठी रुपये २९.६७ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे.
- वरीलप्रमाणे एकूण २८२ शाळा दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरित ४१९ शाळांच्या दुरुस्ती कामासाठी रुपये ९२१.५० लक्ष निधीची मागणी जिल्हा नियोजन समिती रत्नागिरी यांच्याकडे करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील सूर्या प्रकल्पासाठी जमीन दिलेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(५२) * ३२६१२ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील सूर्या प्रकल्पासाठी जमीन दिलेल्या ८४ शेतकऱ्यांना गेल्या ३५ वर्षापासून नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्याचे प्रस्ताव सादर करा असे आदेश सन २०१४ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी देऊनही अद्याप प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सूर्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मावेजा देण्याबाबत व प्रकल्पग्रस्तांचे दाखले तातडीने मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

सूर्या प्रकल्पाच्या धरणांसाठी आवश्यक खाजगी भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली असून कालव्यासाठी संपादित करावयाच्या खाजगी जमिनीच्या १३१ प्रकरणांपैकी ७९ प्रकरणी भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.

(२) जिल्हाधिकारी, पालघर यांचे दिनांक ११/४/२०१७ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त निर्देशानुसार जमिनीचे भूसंपादन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने घेणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) नाही.

तथापि, निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने खाजगी जमिनीचे भूसंपादन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने घेणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील रुग्णालयांमध्ये रुग्णांना दिल्या जाणाऱ्या दर कराराचे नुतनीकरण करण्यास विमा कंपन्यांनी प्रतिसाद न दिल्याबाबत

**(५३) * ३२८४७ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील रुग्णालयांमध्ये पेशंटला दिल्या जाणाऱ्या दर कराराचे नुतनीकरण करण्यासाठी शासकीय विमा कंपन्यांनी प्रतिसाद न दिल्याने ६७ खासगी रुग्णालयांमध्ये कॅशलेस विमा सेवा बंद करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय विमा कंपन्या व कंत्राटी रुग्णालय यांच्या वादात रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विमा कंपन्याचे येथील रुग्णालयांशी त्यांच्या करारांचे नुतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) विमा सेवेबाबत आयआरडीए (Insurance Regulatory and Development Authority of India) हे नियंत्रक प्राधिकरण असून आयआरडीए ही संस्था केंद्र शासनाच्या वित्त विभागाच्या अखत्यारित आहे. सदरील प्रश्न केंद्र शासनाच्या कार्यकक्षेतील आहे.

राज्य शासनाकडून महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य विमा योजना राबविण्यात येते. सदर प्रश्न या योजनेशी संबधित नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर गोरेवाडा प्राणी संग्रहालय प्राधिकरणातील वन मजूरांना प्रलंबित वेतन मिळण्याबाबत

**(५४) * ३२४३६ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर गोरेवाडा प्राणी संग्रहालय प्राधिकरणातील वन मजूर मागील तीन महिन्यापासून वेतनापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वनमजूरांमध्ये अनेक महिला तसेच विधवा महिलांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वनमजूरांना प्रलंबित वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) नागपूर येथील गोरेवाडा प्राणी संग्रहालयातील वनमजूर तीन महिनेपासून वेतनापासून वंचित आहेत ही वस्तुस्थिती नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पाच्या कामास विलंब होत असल्याबाबत

**(५५) * ३११७५ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड : तारांकित प्रश्न क्रमांक २७१९८ ला दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पाच्या कामास सुमारे ३३ वर्षापूर्वी सुरुवात करण्यात आलेली असून प्रकल्पाचा मूळ खर्च रुपये ३७२ कोटी वरुन आता खर्च रुपये १८४९४.७७ कोटींवर गेला असून या रखडलेल्या प्रकल्पाच्या कामास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त प्रकल्पावर रुपये ९६४२.१४ कोटीचा खर्च होऊनही केवळ ४९ हजार हेक्टर म्हणजेच प्रकल्पाच्या एकूण क्षमतेच्या १९ टक्के क्षेत्र ओलिताखाली आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पाचे काम लवकर पूर्ण होऊन अपेक्षित क्षेत्र ओलिताखाली यावे यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करण्याबाबत कोणते नियोजन करण्यात आले वा येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पाच्या कामास विलंब करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) गोसीखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पाची कामे भूसंपादन, पुनर्वसन, वनजमीन संपादन, निधीची उपलब्धता, तांत्रिक अडचणी इ. कारणांमूळे पूर्ण होवू शकली नाहीत. सदर विविध कारणांसाठी कोणतेही अधिकारी व्यक्तीश: जबाबदार नाही. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) प्रकल्पावर झालेल्या खर्चामधून जून, २०१६ अखेर ४९२३८ हे. सिंचनक्षमता निर्माण झाली असून सन १६-१७ मध्ये १३०२५ हे. एवढी अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. त्यानुसार जून, १७ अखेर एकूण ६२२६३ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

(३) प्रकल्पाचा समावेश (PMKSY) प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत करण्यात आलेला असून त्यांतर्गत भौतिक व आर्थिक नियोजन करण्यात आलेले आहे. प्रकल्पासाठी सन २०१७-१८ या अर्थसंकल्पीय वर्षासाठी रुपये ७५० कोटीची तरतुद करण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात चार ठिकाणी तृतीय संदर्भ सेवा अत्याधुनिक कॅन्सर रुग्णालय सुरु करणेबाबत

**(५६) * ३११६१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २४३२९ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या सहकार्याने राज्यात चार ठिकाणी तृतीय संदर्भ सेवा अत्याधुनिक कॅन्सर रुग्णालय सुरू केली जाणार आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अत्याधुनिक रुग्णालयांसाठी शासनाकडून नाशिकसह अमरावती, नागपूर व लातूर या चार शहरांची नावे सुचविण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रुग्णालये तातडीने सुरु होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे. शासनाने नाशिक, अमरावती, लातूर, नागपूर या शहरातील रुग्णालये निश्चित केली आहेत.
(३) राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर हॉस्पिटल नागपूर, विवेकानंद मेडीकल फाऊंडेशन अँड रिसर्च सेंटर लातूर, रिजनल रेफरंस हॉस्पिटल, नाशिक या तीन संस्थांचे प्रस्ताव केंद्र शासनास मंजुरीस्तव पाठविण्यात आले असून, यापैकी राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर हॉस्पिटल, नागपूर या संस्थेचा प्रस्ताव केंद्र शासनाने मंजूर केला आहे व अन्य दोन प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन आहेत.

राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर हॉस्पिटल नागपूरसाठी केंद्र हिश्श्याचा निधी वितरीत केला आहे. विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती यांच्या प्रस्तावाची केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पूर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानंतर प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे वेळकुंड (ता.औसा, जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची होणारी गैरसोय

**(५७) * ३२४२२ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वेळकुंड (ता.औसा, जि.लातूर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी उपस्थित नसल्याने प्रसुतीसाठी आलेल्या महिलेस ताटकळत बसावे लागल्याची घटना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,

(२) तसेच याच महिन्यात अगोदरही एका महिलेस प्रसुतीसाठी ताटकळत थांबावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर प्राथमिक आरोग्य केंद्रात उपस्थित न राहणाऱ्या वैद्यकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, सदर घटना दिनांक ६/५/२०१७ रोजी घडली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय. चौकशीत वैद्यकीय अधिकारी, ओ.पी.डी. एएनएम, परिचर दोषी आढळले आहेत. संबंधित दोषी बंधपत्रीत वैद्यकीय अधिकारी यांची चौकशीअंती तात्काळ बदली करण्यात आली आहे. ओपीडी एएनएम व स्त्री परिचर यांची एक वेतनवाढ थांबवून सदरील घटनेची पुनरावृत्ती होऊ नये याबाबत ताकीद देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत आहार पुरवठामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५८) * ३१०४२ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुपोषित बालके, गरोदर व स्तनदा माता यांना देण्याच्या एकूण आहार कंत्राटाच्या ८८ टक्के कंत्राटे बचत गटांच्या नावाखाली महालक्ष्मी, व्यंकटेश आणि महाराष्ट्र या ३ संस्थांना देण्यात आली असून त्याची किंमत रुपये ४ हजार ८०० कोटी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने बोगस ठरविलेल्या एकूण १८ संस्थांना कंत्राट देण्यात आले असून, या संस्थांच्या नावाखाली वेगळयाच नावाच्या फूड कंपन्याना ही कंत्राटे देण्यात आली व सदरहू बचतगट पुरूष चालवत असल्याने संगनमताने कंत्राटे दिल्यामुळे रुपये ४ हजार ८०० कोटींचा गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बालविकास सेवा (आयसीडीएस) माध्यमातील सर्व पुरवठा ठेकेदारांकडून नव्हे तर ग्रामीण समुदाय स्वयंम सहाय्य गट व महिला गटामार्फत करण्यात यावा असे मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असताना ते डावलून खाजगी ठेकेदारांना ही कामे दिलेली आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, मद्यनिर्मिती क्षेत्रातील “लिकरब्यानर” एनव्हे ग्रुपचे अशोक जैन, सतिश मुंडे, चारूदत्त पालवे हे डायरेक्टर असलेल्या कंपन्यांना उक्त कंत्राटे देण्यात आल्याने सत्तेचा दुरूपयोग करून हा गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार दिनांक ८ मार्च, २०१६ च्या निविदा प्रक्रियानुसार निवड झालेल्या १८ महिला मंडळ/बचतगट/महिला संस्था यांना THR पुरवठयाचे काम मंजूर करण्यात आलेले आहे. त्यामध्ये १) महालक्ष्मी महिला गृहउद्योग व बाल विकास बहुउद्देशीय औद्योगिक सहकारी संस्था, नांदेड, २) व्यंकटेश्वरा महिला औद्योगिक उत्पादन सहकारी संस्था मर्या., उद्गीर, ३) महाराष्ट्र महिला सहकारी गृहउद्योग संस्था, धुळे या संस्थांचाही समावेश आहे.
(२) ई-निविदेव्दारे निवड केलेल्या १८ महिला मंडळ/ बचतगट/ महिला संस्था यांना मा. सर्वोच्च न्यायालयाने बोगस ठरविल्याचे कोणतेही आदेश पारीत केलेले नाहीत. कोणत्याही बचतगट/ महिला संस्थेमध्ये पुरुष सदस्य नाहीत.
(३) निविदा प्रक्रिया ही पूर्णपणे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महिला मंडळ / बचतगट/ महिला संस्था यांच्यासाठी राबविण्यात आली तसेच खाजगी पुरवठाधारकास निविदा भरण्यास मज्जाव करण्यात आला होता.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोंड उमेर (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र रात्रीच्या वेळी सुरु ठेवण्याबाबत

**(५९) * ३४४०३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोंड उमेर (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र रात्रीच्या वेळी बंद असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरातील गावात रात्री एखादा अपघात, विंचू, सर्पदंश झाल्यास किंवा गर्भवती मातांच्या प्रसूतीसाठी रुग्णांना संगमेश्वर येथील शासकीय दवाखान्यात न्यावे लागते त्यामुळे त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या ठिकाणी रात्रीच्यावेळी रुग्णांची होणारी गैरसोय लक्षात घेता सदर प्राथमिक आरोग्य केंद्र रात्रीच्या वेळीही सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे. अत्यवस्थ रुग्णांना प्रथमोपचार करुन संदर्भित करावे लागते.
(३) सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातील नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्यात आलेला आहे. विंचूदंश, सर्पदंश, प्रसुती या प्रकारच्या रुग्णांची माहिती नियंत्रण कक्षास प्राप्त झाल्यानंतर सदर कक्षातील कर्मचाऱ्यामार्फत वैद्यकीय अधिकाऱ्यांना तात्काळ बोलाविण्यात येते. वैद्यकीय अधिकारी रुग्णांवर उपचार करतात व आवश्यकता भासल्यास रुग्णांना संदर्भित केले जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिवाजीनगर (जि.पुणे) येथील बालसुधारगृहात मुलांचे लैंगिक शोषण झाल्याबाबत

**(६०) * ३२६०५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजीनगर (जि.पुणे) येथे शासनाच्या बालसुधारगृहात ई-लर्निंगच्या पडद्यावर अश्लिल चित्रफीत दाखवून मुलांचे लैंगिक शोषण केल्याचा प्रकार माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी आयुक्त, महिला व बालकल्याण, आयुक्त, अपंग कल्याण (पुणे) व जिल्हाधिकारी पुणे यांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास माहिती दिली असता, अधिका-यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर बालसुधारगृहांच्या गैरव्यवस्थेबाबत व रिक्त पदांबाबत लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करणे व रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) दैनिक केसरीच्या दिनांक ३/५/२०१७ व दिनांक ४/५/२०१७ च्या अंकामध्ये अशा आशयाचे वृत्त प्रसारित झाले आहे. तसेच याबाबत सहयाद्री आदिवासी विकास प्रतिष्ठान बालकाश्रम, पळसटीका ता. आंबेगाव जि पुणे यांनी आयुक्त महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांचेकडे तक्रार केली आहे.
(२) नाही.
(३) शिवाजीनगर (जि.पुणे) येथील बालसुधारगृहाच्या गैरव्यवस्थेबाबत मंत्री महोदयांना लोकप्रतिनिधीकडून दिनांक ३१/०५/२०१७ चे लेखी निवेदन दिले आहे.
(४) मुलांचे लैंगिक शोषण केल्याच्या प्रकरणी शिवाजीनगर पोलिस स्टेशन येथे गुन्हा क्र १५४/२०१७ दाखल करण्यात आला असून पोलीस तपास चालू आहे व सहयाद्री आदिवासी विकास प्रतिष्ठान बालकाश्रम, पळसटीका ता. आंबेगाव जि पुणे यांनी घेतलेले आक्षेप व केलेली तक्रार यास अनुसरुन आयुक्त महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी सर्वसमावेशक चौकशी करीता त्रिसदस्यीय समिती नेमली आहे. तसेच निरीक्षणगृहांतील रिक्त पदे पुढील आदेशापर्यंत बाहय यंत्रणेमार्फत (Out source) भरण्याकरीता आयुक्तालयस्तरावरुन दिनांक १४/७/२०१७ अन्वये सर्व निरीक्षणगृहांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथे मुलींसाठी असलेल्या सुधारगृहाची दूरवस्था झाल्याबाबत

**(६१) * ३२९२१ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या विशेष प्रतिनिधीनी नागपूर येथे मुलींसाठी असलेल्या सुधारगृहास दिनांक १५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास भेट दिली असता, सदर सुधारगृहाची दूरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सुधारगृहात कोणकोणत्या बाबींचा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर येथील मुलींच्या सुधारगृहाची दूरवस्था दूर करुन त्यांना सोई सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या प्रतिनिधींनी शासकीय मुलींचे निरीक्षणगृह/बालगृह, कटोल रोड, नागपूर या संस्थेस भेट देऊन अहवाल दिला आहे.

(२) सदर अहवालामध्ये संस्थेतील सुरक्षा व्यवस्था, कमी कर्मचारी वर्ग व कमी अनुदान याबाबत भाष्य करण्यात आले आहे.

(३) संस्थेत, सी.सी.टि.व्ही. कॅमेरे लावले आहेत, ‘अक्षयपात्र’ या संस्थेकडून मुलींना चांगले, सकस, सात्विक व परिपूर्ण आहार पुरविण्यात येत आहे, संस्थेच्या कामकाजासाठी एकूण १३ पदे मंजूर आहेत. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी एकात्मिक बाल संरक्षण योजनेंतर्गत अनुदानाचा पहिला हप्ता संस्थेस वितरित करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे नांद्रे (ता.मिरज, जि.सांगली) येथील क्षारपड जमीन विकासाबाबत

**(६२) * ३२१३८ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नांद्रे (ता.मिरज, जि.सांगली) येथील क्षारपड जमीन विकासासाठी दिनांक १४ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास २६ शेतकऱ्यांनी स्वत:ला गाडून घेण्याचे आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गावातील क्षारपड जमिनीचा विकास करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.
(२) होय.

सांगली जिल्हयातील वाळवा, पलूस व मिरज तालुक्यातील क्षारपड क्षेत्र सुधारणा करणेबाबत रुपये ५२९२.१० लक्ष रकमेचा प्रस्ताव मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) पुणे यांचे पत्र जा.क्र.प्रशा-२/१८१/ सन २०१७ दिनांक ०७/०१/२०१७ अन्वये जलसंधारण विभागास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावामध्ये मौजे नांद्रे ता.मिरज या गावाचा समावेश करण्यात आला होता.

परंतु दिनांक ०४/०२/२०१७ रोजीच्या प्रधान सचिव (कृषी) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत जलसंपदा विभागाच्या लाभक्षेत्रातील क्षारपड जमीन सुधारणा करणेची जबाबदारी जलसंपदा विभाग यांची असल्याचे सूचित केले. मौजे नांद्रे हा भाग कोणत्याही प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील नसून सदर क्षेत्र वसंतदादा सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील उपसा सिंचनांतर्गत आहे. त्यास्तव दिनांक ८ जुलै, १९८१ च्या शासन निर्णयानुसार चर योजनांचे सर्वेक्षण मागणीनंतर जलसंपदा विभागाद्वारे करण्यात येते व चर योजनांची अंदाजपत्रके लाभधारकांना देण्यात येतात व चर बांधणीचे काम लाभधारकांनी स्वखर्चाने करणे अपेक्षित आहे. याबाबत संबंधितांना दिनांक ०५/१२/२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# पुणे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रामधील डॉक्टर रजेवर असल्याबाबत

**(६३) * ३४३९१ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील ९६ प्राथमिक आरोग्य केंद्रामधील ४८ डॉक्टर विविध कारणांनी वर्षभरापासून रजेवर असल्याने जिल्हयातील आरोग्य सेवेवर ताण पडत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रजेवर असलेल्या ४८ डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे,

पुणे जिल्हयातील ९६ प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ४७ रिक्त पदांपैकी २३ वैद्यकीय अधिकारी पदव्युत्तर शिक्षणासाठी गेल्यामुळे, सेवानिवृत्ती/राजीनामा इ. कारणांमुळे १७ तर अनधिकृत गैरहजरीमुळे ७ पदे रिक्त आहेत. तथापि, ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये दोन्ही वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त आहेत त्या ठिकाणी अन्य प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.
(२) होय, जिल्हा परिषद व उपसंचालक स्तरावर आढावा घेऊन चौकशी करण्यात आली आहे. अनधिकृत गैरहजर असणाऱ्या १ वैद्यकीय अधिकारी यांनी सेवेमध्ये पुन्हा रुजू करुन घेण्याची विनंती केली असून त्याबाबत कार्यवाही सुरु आहे. तसेच इतर ६ वैद्यकीय अधिका-यांच्या सेवा समाप्तीबाबतच्या प्रस्तावावर उपसंचालक व जिल्हा परिषद स्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच पदव्युत्तर शिक्षणासाठी गेलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या जागी नव्याने वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विक्रमगड तालुक्यातील (जि.पालघर) देहरजी मध्यम सिंचन प्रकल्पातील पाणी स्थानिकांना आरक्षित करुन देण्याबाबत

**(६४) * ३४२०७ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड तालुक्यातील (जि.पालघर) आदिवासी भागात सिंचनासाठी राखून ठेवलेले देहरजी मध्यम प्रकल्पाचे पाणी शासनाने वसई-विरार महानगरपालिकेस पिण्यासाठी हस्तांतरीत केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने महानगरपालिकेसमवेत केलेल्या करारात सदर भागातील शेतकरी व नागरीकांना पिण्यासाठी, सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यासंदर्भात राखीव तरतूद केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी भागातील शेतकरी व नागरिकांना पिण्यासाठी, सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, सदर प्रकल्पात पुनर्वसित होणाऱ्या गावांसाठी धोरण आखून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) शासन निर्णय दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये देहरजी मध्यम प्रकल्पातून वसई-विरार महानगरपालिकेसाठी पिण्याच्या कारणास्तव पाणी आरक्षित करण्यात आल्यामुळे सिंचनासाठी तरतूद नाही.

(२) नाही.

वसई विरार शहर महानगरपालिका व शासन यांचे समवेत अंतिम करारनामा करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१४/प्र.क्र.६८/१४/मध्यम प्रकल्प, मुंबई-३२ दिनांक ०४/०३/२०१४ अन्वये देहरजी मध्यम प्रकल्पातून ६९.४२ द.ल.घ.मी. पाणीसाठा वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पिण्याच्या पाण्यासाठी व २३.८० द.ल.घ.मी. पाणीसाठा राखीव (Carry over) ठेवण्यास मान्यता दिलेली आहे.

(३) उपरोक्त शासन निर्णयानुसार देहरजी मध्यम प्रकल्प पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित केला असल्याने सिंचनासाठी तरतूद नाही.

(४) प्रचलित शासन नियमानुसार प्रकल्पाच्या बाधित गावांचे पुनर्वसन करण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडगांव (ता.सावनेर, जि.नागपूर) येथे लेबर वॉर्डमध्ये भरती झालेल्या महिलेस रुग्णालयातून बाहेर काढल्याबाबत

**(६५) * ३१३०१ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडगांव (ता.सावनेर, जि.नागपूर) येथील महिला ६ तासापूर्वी जन्मलेल्या बाळाला घेवून उपचाराकरीता इंदिरा गांधी वैद्यकीय रूग्णालय (मेयो) येथे लेबर वार्डात भरती झाली असता मेयोच्या डॉक्टरांनी उपचार न करता बळजबरीने बाहेर काढल्याने सदर महिलेला व्हरांडयात रात्र काढावी लागल्याचे दिनांक ४ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हयातील धरणग्रस्तांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(६६) * ३३७१७ श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्हयातील तारळी, वांग, मराठवाडी, मोरणा, गुरेघर, उत्तरमांड आणि महिंद मध्यम धरणग्रस्तांचे वीज, पाणी पर्यायी जमिनी इ. प्रश्न अदयाप प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धरणग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न निकाली लागावेत यासाठी मा.पालकमंत्री यांनी उच्चस्तरीय बैठकीत संबंधित अधिका-यांना सूचना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. पालकमंत्री यांच्या सूचनांनुसार सदर धरणग्रस्तांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय,

(३) मा.राज्यमंत्री, जलसंपदा, जलसंधारण आणि संसदीय कार्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५/०४/२०१७ रोजी "वांग मराठवाडी धरण पुनर्वसनाबाबत" महसूल व पुनर्वसन विभागातील अधिकारी तसेच प्रकल्पग्रस्त प्रतिनिधी यांचेसमवेत बैठक संपन्न झाली. सदरहू बैठकीत मा.राज्यमंत्री महोदयांनी धरणग्रस्तांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी कार्यवाही तातडीने करणेबाबत निर्देश दिले आहेत. याबाबतची कार्यवाही महसूल व पुनर्वसन विभागामार्फत प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत वाहन सेवा पुरविण्याच्या कंत्राटात अनियमितता झाल्याबाबत

**(६७) * ३१२८८ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत सन २०१६-१७ च्या कंत्राटी वाहन सेवा पुरविण्याच्या कंत्राटात मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याची तक्रार मा. लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीन्वये शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच पात्र संस्थेस काम देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) मा.लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक, यांच्यास्तरावरुन सदर तक्रारीबाबत सखोल चौकशी करुन स्वयंस्पष्ट अभिप्राय देण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(३) ई-निविदेतील न्युनतम दर धारक संस्था यांना पुरवठा आदेश देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे अपघात विभागाचे प्रवेशद्वार बंद असल्याबाबत

**(६८) * ३३१२२ श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (मेडीकल) नागपूर मध्ये अपघात विभागाचे प्रवेशद्वार सुरक्षेच्या कारणास्तव बंद असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान बंद असल्याने सर्वसाधारण रुग्ण व नातेवाईकांना गैरसोयीचे ठरत असून रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे काय,
(२) असल्यास, मेडिकलमध्ये पास सिस्टीम सुरु केल्याने अर्ध्यापेक्षा जास्त रुग्णांच्या नातेवाईकांना उघडयावर रहावे लागत असून लाखो रुपये खर्च करुन बांधण्यात आलेले प्रतिक्षालय रिकामे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत असलेल्या निवासी डॉक्टरांच्या सुरक्षेकरिता अर्थिक तरतूद करण्याबाबत

**(६९) * ३२२२० श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत असलेल्या निवासी डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी राज्य शासनावर रुपये ३४ कोटीचा अतिरिक्त भार पडणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने निवासी डॉक्टरांना सुरक्षा पुरविण्याचा निर्णय घेतला तरी काही ठिकाणी अजूनही हल्ले होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी नविन आर्थिक तरतूद करण्याबाबत तसेच डॉक्टरांवरील हल्ले रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) दिनांक ३० मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि संलग्नित रूग्णालयांमधील डॉक्टरांच्या सुरक्षेबाबत सल्लागार समिती गठीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माणगांव (जि.रायगड) तालुक्यातील रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(७०) * ३३३१९ श्री.प्रविण दरेकर, श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव (जि.रायगड) तालुक्यातील रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच रायगड जिल्हयातील जिल्हा सामान्य रूग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, दवाखाने इत्यादी विभागातील पदे रिक्त असल्याने जिल्हयातील रूग्ण सेवेवर विपरित परिणाम झाल्याच्या तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे अंशतः खरे आहे.

रायगड जिल्हयातील माणगांव तालुक्यामध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकुण २६ पदे मंजूर असून त्यापैकी १९ पदे भरलेली व ७ पदे रिक्त आहेत. उप जिल्हा रुग्णालय, माणगांव येथे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आय.पी.एच.एस. खाली बधिरीकरणतज्ञ, अस्थिव्यंगतज्ञ, जनरल सर्जन व दंतशल्यचिकित्सक ह्या विशेषज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून रुग्णांना आवश्यक रुग्ण सेवा पुरविण्यात येत असून रुग्णांची गैरसोय होऊ दिली जात नाही.

(२), (३) व (४) हे अंशतः खरे आहे,

निवेदने प्राप्त झालेली आहेत. तथापि, वैद्यकीय अधिकारी गट-अ (ग्रेड पे. रु.५४००) संवर्गाची रिक्त पदे रायगड जिल्हाधिकारी यांच्यामार्फत वाक-इन-इंटरव्ह्यूने भरण्याची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु असून १३ पदे भरली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हयातील अंगणवाड्यांमधील बालकांच्या दुर्धर आजारांबाबत

**(७१) * ३१०४८ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील अंगणवाड्यांमधील बालकांच्या आरोग्य तपासणीत विविध प्रकारच्या दुर्धर रोगाने आजारी असलेली सुमारे ३९ बालके, अतिशय कमी वजन असलेली २४ तर कमी वजन असलेली २९५ बालके आढळल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्हयातील बालकांच्या आरोग्य विकासासाठी अंगणवाड्यांमार्फत कोणत्या उपाययोजना राबविण्यात आल्या वा येत आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयात माहे मे, २०१७ अखेर अंगणवाडयामधील तपासणीमध्ये दुर्धर आजाराची एकूण २२ बालके आढळलेली आहेत. तिव्र कमी वजन असलेली सॅम बालके २४ असून मध्यम कमी वजन असलेली मॅम बालके २९५ आहेत.

(२) सिंधुदुर्ग जिल्हयांतील बालकांच्या विकासासाठी तसेच पोषण वृध्दीसाठी खालील उपाय योजना केलेल्या आहेत.

१) बालस्वास्थ कार्यक्रमामार्फत महिन्यातून दोन वेळा अंगणवाडी बालकांची तपासणी केली जाते.

२) वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या मार्फत प्रति तीन महिन्यांनी कार्यक्षेत्रातील अंगणवाडी केंद्रातील बालकांची तपासणी केली जाते.

३) हृदय रोगाने आजारी असणाऱ्या बालकांकरीता दिनांक २९ एप्रिल रोजी २ DEcho Camp घेण्यात आले. सदर Camp मध्ये १० बालकांची तपासणी करण्यात आली.

४) बालरोग तज्ञांकडून अशा मुलांची तपासणी करण्यात येते.

५) ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर महिला व स्तनदा मातांना घरपोच आहार (THR) दिला जातो. तसेच ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील तीव्र कमी वजनाच्या बालकांना अतिरिक्त आहार दिला जातो.

६) ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार दिला जातो.

७) जिल्हा रुग्णालयामध्ये तीव्र कमी वजन असलेल्या (सॅम) श्रेणीतील बालकांसाठी पोषण पुनर्वसन केंद्र (एनआरसी) स्थापन करण्यात आलेले असून सदर एनआरसी केंद्रात बालकांना दाखल करुन उपचार केले जातात.

८) जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून महिला व बाल विकास १० टक्के सेस निधीतून विशेष आहार म्हणून आयर्न सिरपचा लाभ दिला जातो.

वरीलप्रमाणे उपाययोजना आरोग्य विभाग व महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग तसेच अंगणवाडी केंद्रामधून नियमित करण्यात येत आहे.

दुर्धर आजाराची एकूण २२ बालकांपैकी ११ बालकांची शस्त्रक्रिया झालेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे पोटेगाव (ता.करमाळा, जि.कोल्हापूर) येथे कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्यात पाणीसाठा होत नसल्याबाबत

**(७२) * ३४३०१ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे, पोटेगाव (ता.करमाळा, जि.कोल्हापूर) येथे सन १९९३ मध्ये ५५.९१ टीएमसी पाणीक्षमता असणारे ३९ दरवाजे असलेल्या कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेली २३ वर्षे या नदीला वारंवार पाणी येऊनही या बंधा-यात एकदाही पाणी साठवणूक केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या नदीवर पाणीसाठा करणेबाबत पोटेगाव, बाळेवाडी, तरटगाव, नीलज, पोथरे, बिटरगाव या गावातील लोकांनी वारंवार क्षेत्रिय अधिका-याकडे लेखी निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या नदीवरील बंधाऱ्यावर तात्काळ दरवाजे बसवून भविष्यात नदीतील पाणी साठवणूक करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) मौजे पोटेगाव येथे ३९ गाळयाचा व ५५.९१ द.ल.घ.फू क्षमतेचा को.प.बंधारा बांधण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

सन १९९३-९४ ते २०१०-११ या कालावधीत को.प. बंधा-यात पाणीसाठा करण्यात आला होता. सन २०१२-१३ पासून करमाळा तालुक्यात अल्प पर्जन्यमान झाल्याने सीना नदीत पुरेसा विसर्ग न आल्याने सदर कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-यात पाणी साठवणूक झालेली नाही.

(३) होय.

(४) यावर्षी नदीतील पाणी प्रवाहाच्या उपलब्धतेनुसार पाणी अडविण्याचे नियोजित आहे. त्यासाठी आवश्यक ती दुरूस्ती करणे व दरवाजे उपलब्ध करण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-------------------

## राज्यातील मतीमंद व अन्य मुलांसाठी बालसुधारगृहे चालविणाऱ्या संस्थांना दिल्या जाणाऱ्या अनुदानाबाबत

**(७३) * ३१४१४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मतीमंद तसेच अन्य मुलांसाठी बालसुधारगृहे चालविणा-या संस्थाना दिल्या जाणा-या अनुदानात शासनाने दिनांक १ एप्रिल, २०१७ पासून दुप्पटीहून वाढ करावी असा आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बालसुधारगृहातील मुलांमध्ये प्रत्येकी दरमहा २ हजार व प्रशासकीय खर्चासाठी रुपये ५००/- दयावे असे मा. न्यायालयाने सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शासनाने बालसुधारगृहांचे अनुदान दुप्पटीने वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

जनहित याचिका क्र. १८२/२०१० ही याचिका निकाली काढताना दिनांक ७/४/२०१७ रोजीच्या निर्देशामध्ये मा. उच्च न्यायालयाने सहायक अनुदानात वाढ करणेबाबत शासनास निर्देश दिले आहेत.

(२) नाही.

मा. उच्च न्यायालयाचे मतीमंद बालगृहांसाठी रूपये २०००/- प्रति प्रवेशित प्रति माह तर रूपये १५००/- प्रति प्रवेशित प्रति माह सर्वसाधारण बालगृहांसाठी व इतर प्रशासकीय खर्चासाठी रूपये ५००/- इतकी वाढ करावी असे निर्देश आहेत.

(३) शासनाच्या विविध विभागांतर्गत चालविण्यात येणाऱ्या अनुदानित निवासी विद्यार्थ्यांच्या परिपोषण अनुदानात वाढ करण्यासाठीची बाब मा.न्यायालयाच्या निर्देशापूर्वीच शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दिनांक

१/३/२०१६ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला व बालविकास विभाग यांच्या अंतर्गतच्या अनुदानित निवासी संस्थांना देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात वाढ करण्यासाठी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची नेमणूक करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्हयात महिलांकरीता १०० खाटांचे स्त्री रुग्णालय उभारण्याबाबत

**(७४) * ३३३०२ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात ६ तालुके व ६६८ गावाची लोकसंख्या १३ लाख असून भंडारा येथे असलेल्या जिल्हा रुग्णालयात नागरिक उपचाराकरिता येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात महिलांकरीता रुग्णसेवा अल्प असल्यामुळे महिला रुग्णांची गैरसोय होत आहे, प्रसूतीकरिता आलेल्या महिला दगावल्याचे प्रकारही येथे घडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा जिल्हयात महिलांकरीता १०० खाटांचे स्वतंत्र स्त्री रुग्णालय असावे याकरीता लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

जिल्हा रुग्णालय, भंडारा येथे महिला रुग्णांची गैरसोय होत नाही परंतू सर्व प्रकारचे वैद्यकीय उपचार करण्यात येतात.

(३) होय, हे खरे आहे.

(४) शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०१३ अन्वये भंडारा जिल्हयासाठी १०० खाटांचे स्त्री रुग्णालय मंजुर करण्यात आले आहे. या रुग्णालयासाठी शासन निर्णय दिनांक ०७ जुलै, २०१७ अन्वये रुपये ४३.८५ कोटी च्या बांधकामास प्रशासकीय मान्यता दिली आहे. निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कळंब (जि.उस्मानाबाद) पंचायत समितीच्या आवारात असलेल्या कर्मचारी निवासस्थानाची दूरवस्था झाल्याबाबत

**(७५) * ३३६९६ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळंब (जि.उस्मानाबाद) पंचायत समितीच्या आवारात असलेल्या कर्मचारी निवासस्थानाची दूरवस्था झाली असून सदर इमारतीतील कर्मचारी जीव धोक्यात घालून राहत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंचायत समितीच्या मान्यताप्राप्त आकृतीबंधानुसार कार्यरत असणा-या कर्मचा-यांच्या तुलनेत उपलब्ध असलेली निवासस्थाने कमी पडत असून सदर निवासस्थाने मोडकळीस आलेली असल्याने कर्मचा-यांना भाडयाच्या घरात रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने अतिरिक्त निवासस्थाने उभारण्याबाबत व दूरवस्थेतील निवासस्थानांची दुरुस्ती करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे, तथापि, सद्य:स्थितीत त्या ठिकाणी कोणतेही कर्मचारी रहात नाहीत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) जिल्हा परिषदेकडून पंचायत समिती, कळंब करीता अतिरिक्त निवासस्थाने उभारण्याबाबत कोणताही प्रस्ताव शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही. कळंब पंचायत समितीच्या निवासस्थानाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव दिनांक १९/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला असून त्याची छाननी सुरु आहे.

-----------------

## वेळापत्रकाआधीच उजनी धरणातून पाणी सोडून पाण्याचा अपव्यय केल्याबाबत

**(७६) * ३१२२४ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी धरणातून दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत ३९ दिवस शेतीसाठी पाणी सोडल्यानंतर पुढील पाण्याच्या आर्वतनासाठी दिनांक १०/०४/२०१७ रोजी किंवा त्यासुमारास मागणी केल्यानंतर ताबडतोब दिनांक ११/०४/२०१७ रोजी उजनी धरणातुन शेतकऱ्यांना आवश्यकता नसताना पाणी सोडण्यात आले त्यामुळे पाण्याचा अपव्यय झाला असे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक १४/०६/२०१७ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदन आणि त्यासंदर्भातील तक्रारीचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय. मा. श्रीमती विद्या चव्हाण, वि.प. स. यांनी मा. मंत्री (जलसंपदा) यांना दिनांक १४/४/२०१७ रोजी निवेदन दिलेले आहे.

(२) शेतासाठी पाण्याची आवश्यकता ३० एप्रिल ते मे च्या पहिल्या आठवडयात असताना, ११ एप्रिल व त्यादरम्यान अनावश्यक पाणी सोडले आहे. त्यामुळे मे अखेर किंवा पाऊस लांबल्यास पाणी कमी पडेल, अशा आशयाचे निवेदन आहे,

(३) कालवा आवर्तनासाठी पुरेशा दाबाने विसर्ग प्राप्त होण्यासाठी, सोलापूर शहरासाठी पिण्याचे पाणी भिमा नदीत सोडण्यापूर्वी कालवा आवर्तन सुरू करणे आवश्यक होते. कारण सोलापूर शहरासाठी नदीमध्ये पाणी सोडल्यानंतर जलाशयातील पाणी झपाट्याने कमी होणार होते. त्याकरीता दिनांक १०/४/२०१७ पासून मा. अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्या परवानगीने कालवा आवर्तन सुरू केले होते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील जलयुक्त शिवार अभियानातील गैरप्रकारांबाबत

**(७७) * ३३८९४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २७९१० ला दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिंतुर व सेलू तालुक्यातील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात आलेल्या सिमेंट नाला बांधकामाची कामे ज्या यंत्रणेने केली त्याच यंत्रणेकडून चौकशी करून गैरप्रकार दडपण्याचा प्रकार करण्यात आल्याने मा. जलसंपदा मंत्री यांनी इतर तांत्रिक अधिकाऱ्यांकडून अहवाल सादर करण्याचे आदेश विभागीय आयुक्त यांना सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी जिल्हयातील मागील ३ वर्षात झालेले जलयुक्त शिवार अभियानाची बहुतांशी कामे, अधिकारी, कंत्राटदार व यंत्रणा यांनी संगनमताने केल्याने, त्या कामाची चौकशी सेवानिवृत्त न्यायाधीश पथकामार्फत करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पाथरी तालुक्यातील डोंगरगाव १ व २ तसेच झरी येथील क्र.३ व जिंतूर तालुक्यातील चारठाणा येथील क्र.५ हे सिमेंट बंधारे कंत्राटदार व लघुपाटबंधारे विभागातील अधिकारी यांनी भागीदारीत केल्याने त्या सर्व बंधाऱ्यांची तांत्रिक चौकशी जलसंधारण विभागाच्या राज्यस्तरीय दक्षता व गुणनियंत्रण पथकामार्फत करण्यात यावी अशी मागणी पाथरी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे सन २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कामात पारदर्शकतेचा व दर्जेदारपणाचा अभाव त्रयस्त यंत्रणेच्या तपासण्याबाबतची संशयास्पद स्थिती व इतर प्रकरणांची चौकशी करण्याबाबतचे आदेश मा.जलसंधारण मंत्री यांनी जिल्हाधिकारी, परभणी यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, वरील तक्रारीवरून जिल्हाधिकारी परभणी व निवृत्त न्यायाधीशांच्या पथकामार्फत जलयुक्त शिवार अभियानाच्या सर्व कामांची कामनिहाय चौकशी करण्यात आली आहे काय, तसेच उक्त प्रकरणी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी सेवानिवृत्त न्यायाधीश तसेच सेवानिवृत्त तांत्रिक दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या पथकामार्फत चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अहवाल सादर केल्याप्रमाणे दोषी अधिकारी, यंत्रणा व कंत्राटदार यांच्याविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) इतर तांत्रिक यंत्रणेकडून तपासणी करण्याचे निदेश मा.मुख्य सचिव यांनी दिले आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अशी तक्रार आढळून आली नाही.
(४) नाही.
(५) निवृत्त न्यायाधिशांच्या पथकामार्फत चौकशी करण्यात आली नाही. तथापि, जिल्हयाबाहेरील तांत्रिक अधिकारी यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. तसेच त्रयस्थ संस्था, वाप्कोस यांचेमार्फत सदर कामांचे मूल्यमापन करण्यात आले आहे.
(६) चौकशी अहवालावर मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

-----------------

## शासनाने करवसूलीच्या रचनेत सुधारणा करण्याबाबत

**(७८) * ३४३५६ आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक २७७२९ ला दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाला आगामी ६ वर्षामध्ये ८७ हजार कोटींचे कर्ज फेडायचे असल्याने राज्याच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडेल असा इशारा भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षकांनी (कॅग) राज्य शासनास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने करवसूलीच्या रचनेत सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे राज्य वित्तव्यवस्थेवरील ३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या वर्षाच्या अहवालामध्ये नमूद केल्यानुसार, राज्याच्या कर्जाच्या परिपक्वतेची रुपरेखा असे दर्शविते की, राज्याच्या एकूण कर्जाच्या जवळपास ५१.५ टक्के रकमेची पुढील सात वर्षात परतफेड करायची आहे. राज्याचे कर्ज फेडीचे दायित्व २०१९-२१ दरम्यान रुपये ३७,७६१.४२ कोटी इतके असेल आणि २०२१-२३ मध्ये रुपये ४९,२६१.४२ कोटी असेल.

राज्य शासनाच्या देशांतर्गत कर्जामध्ये ६६.५१% बाजार कर्जे (OMB) चा समावेश असून सदर कर्ज परतफेडीचा सर्वसाधारण कालावधी १० वर्ष असल्याने पुढील सात वर्षात राज्याच्या देशांतर्गत कर्जाच्या ५१.५०% रकमेची परतफेड करणे अपेक्षित आहे.

राज्य शासन विकास कामांसाठी प्रत्येक वित्तीय वर्षात बाजार कर्जे (OMB) व इतर कर्ज घेत असल्याने सदर कर्जाची परतफेडीची प्रक्रिया निरंतर सुरु राहणार आहे.

(२) वस्तू व सेवा कर प्रणालीची अंमलबजावणी दिनांक १ जुलै, २०१७ पासून सुरु झाली आहे. सदर प्रणालीमुळे वस्तू व सेवा कर परिषदेने शिफारस केल्याप्रमाणे कराची कार्यपद्धती अंमलात येणार आहे. राज्यामार्फत अंमलात येणाऱ्या करासंदर्भात अपीलामध्ये अडकलेल्या महसूलाबाबत जलदगतीने निर्णय घेण्याचे तसेच प्रलंबित वसूलीबाबत कार्यवाही संबंधित करविभागाकडून करण्यात येत आहे.

(३) लागू नाही.

----------------

## अमळनेर, पाचोरा, यावल, चाळीसगाव, (जि.जळगाव) तालुक्यात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कामे सुरु करण्याबाबत

**(७९) * ३४२१९ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयात गेल्या वर्षी जलयुक्त शिवार अभियानांतर्गत २३२ गावांमध्ये झालेल्या कामांमध्ये ३० हजार टी.एम.सी. जलसाठा निर्माण होवून भूजल पातळी दीड मीटरने वाढून त्यामुळे जवळपास ५८ हजार हेक्टर शेतजमिनीला लाभ झालेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा जिल्हयातील टंचाईग्रस्त गावांची व टँकरच्या संख्येत मोठया प्रमाणात घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमळनेर, पाचोरा, यावल, चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यात अद्याप कामे सुरु न झाल्यामुळे कामाच्या वर्क ऑर्डर झालेली नसल्यामुळे कामे केव्हा पूर्ण होतील व त्यात केव्हा पाणी साचेल याबाबत शेतक-यांमध्ये शंका निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कामे त्वरीत सुरु करण्याबाबत आदेश जिल्हाधिका-यांना देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

जलयुक्त शिवार अभियान सन २०१५-१६ अंतर्गत अमळनेर, पाचोरा, यावल व चाळीसगाव तालुक्यात निवड केलेल्या गावामधील १०० टक्के कामे पूर्ण झाली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील आंबोली धरण प्रकल्पग्रस्तांना सुधारित दराने जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत

**(८०) * ३२४६५ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील आंबोली धरण लघुपाटबंधारे प्रकल्पांतर्गत उजव्या व डाव्या तीर कालव्याचे काम कंत्राटदाराने निविदा शर्ती व अटीनुसार विहित मुदतीत पूर्ण करणे आवश्यक असूनही माहे जून, २०१५ पासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, धरण क्षेत्रातल्या हजारो शेतकऱ्यांना कालव्याचे पाणी न मिळाल्याने खरीप हंगामावरच गुजराण करावी लागत असून बागायतदारांचेही मोठे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्प उभारणी करताना रब्बी हंगामाचा शेतकऱ्यांना फायदा मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे, तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सुधारित दराने जमिनीचा मोबदला मिळावा अशी प्रकल्पग्रस्तांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कालव्याचे काम पूर्ण करून आंबोली धरण परिसरातील क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना सुधारित दराने जमिनीचा मावेजा मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) व (३) होय,

धरणाचे काम १००% पूर्ण झाले असून दोन्ही कालव्याची कामे भूसंपदनाअभावी अपूर्ण असल्यामुळे पूर्णत: सिंचन क्षमता निर्माण झालेली नाही.

प्रकल्पग्रस्त शेतक-यांनी सुधारित दराने जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी मा.जिल्हा न्यायालय, अलिबाग येथे दावे दाखल केलेले आहेत.

(४) आंबोली धरण परिसरातील क्षेत्र ओलिताखाली आणण्यासाठी दिनांक ९/६/२०१६ च्या शासन निर्णयानुसार नवीन धोरणानुसार कालव्यांची कामे बंदिस्त पाईपलाईन पध्दतीने करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना सुधारित मावेजा मिळण्याबाबत दाखल केलेले दावे अलिबाग येथील मा.जिल्हा न्यायालयात न्यायप्रविष्ट आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तापी नदीवरील उकई धरणातून पाणीवापर योजनेच्या पूर्वसंभाव्यता अहवालाबाबत

**(८१) * ३२०७५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७९६६ ला दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उकई धरणातुन ५ अ.घ.फु. पाणी वापराच्या योजनेचा पूर्वसंभाव्यता अहवाल (Pre feasibility report) तयार करण्याची प्रगतीपथावरील कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, नर्मदा पाणी तंटा लवादानुसार राज्याच्या वाट्यास नर्मदा खोऱ्यातील १०.८९ अ.घ.फु. पाण्यापैकी गुजरात राज्यातील तापी नदीवरील उकई जलाशयातून महाराष्ट्रास ५ अ.घ.फु. पाणी मिळण्यासाठी गुजरात व महाराष्ट्र शासनात दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास सामंजस्य करार झाला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तावित बाब '१' चे अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) पूर्व संभाव्यता अहवाल (Pre-feasibility report) तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर प्रगतीत आहे.

(२) होय.

(३) प्रस्तावित बाब क्र.१ च्यानुसार कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घनसांवगी तालुक्यातील (जि.जालना) प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(८२) * ३२१९० श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसांवगी तालुक्यातील (जि.जालना) जि.प. आरोग्य विभागाची कु.पिंपळगाव, राणीउचेगांव, तिर्थपुरी, राजाटाकळीसह राजंणी ही पाच आरोग्य केंद्र व २७ आरोग्य उपकेंद्रे कार्यरत असून या केंद्र व उपकेंद्राद्वारे ग्रामीण भागातील रुग्णांना आरोग्य सेवा पुरविल्या जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांसह ६५ पदे रिक्त असल्याने रुग्णांना आरोग्य सेवा देण्यासाठी अनेक अडचणी येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वैद्यकीय अधिकाऱ्यांसह रिक्त असलेली पदे भरणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

घनसावंगी तालुक्यातील ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २७ उपकेंद्रे व २ आयुर्वेदिक दवाखाने येथे वैद्यकीय अधिकाऱ्यांसह एकूण ११५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ६४ पदे भरली असून ५१ पदे रिक्त आहेत. कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांसह ग्रामीण जनतेस आरोग्य सेवा दिल्या जातात. त्यामुळे रुग्णांना अडचणी येत नाहीत.

(३) वैद्यकीय अधिकारी यांची ३ रिक्त पदे भरण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडून कार्यवाही करण्यात येत असून गट-क ची ४८ पदे जाहिरात देऊन भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ योजनेची थकीत वीज देयके अदा करण्याबाबत

**(८३) * ३१६९७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील म्हैसाळ योजना ही दिनांक १७ जानेवारी, २०१७ पासून सुरु झाली असून चांदोली धरणातील पाण्यावर या योजनेचे भवितव्य आहे, परंतु वीज देयकाच्या थकबाकीमुळे ही योजना बंद पडण्याचा धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चार दुष्काळी तालुक्यातील ४० हजार हेक्टर जमिनीला उन्हाळ्यात पाणीपुरवठा करणाऱ्या म्हैसाळ योजनेच्या प्रलंबित वीज देयकासाठी वीज वितरण कंपनीने वीज पुरवठा खंडित करण्याची नोटीस पाठविल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुमारे १०० हजार एकर क्षेत्रातील पिकांना प्रत्यक्ष लाभ होत असताना सदर देयके भरली जात नाहीत याची शासनाने चौकशी करुन देयके अदा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच, सदर योजनेसाठी शासनाने २ हजार कोटींचा भांडवली खर्च करूनही अद्याप पोटकालव्यांची कामे अपूर्ण आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

म्हैसाळ योजनेचे विद्युत देयक थकबाकीमुळे जून, २०१६ मध्ये विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. सदर विद्युत पुरवठा जानेवारी, २०१७ मध्ये पूर्ववत करण्यात आल्यानंतर दि. १७/०१/२०१७ ते २०/०५/२०१७ अखेर योजनेचे पंप सलगतेने सुरु ठेवून लाभक्षेत्रात सिंचनासाठी ६.३१ अ.घ.फू. पाणी देण्यात आले आहे.

(२) होय.

(३) म्हैसाळ योजनेचे थकीत पाणीपट्टी वसुलीसाठी वेळोवेळी विविध अभियान राबविणेत येते. यामध्ये जिल्हयातील प्रमुख वर्तमानपत्रातून लाभधारकांना जाहीर आवाहन करणेत येते. तसेच खात्यामार्फत पाणी मागणी अर्ज व पाणीपट्टी वसुलीसाठी कार्यक्षेत्रावरील शाखा कार्यालयामार्फत खास मोहीम

राबविली जाते यामध्ये गांवनिहाय बैठका घेणे, लाभधारकांना नोटीस देणे, थकबाकीदारांची यादी गांवचावडीवर लावणे इत्यादी पध्दतीने अभियान राबवून जनजागरण/ प्रबोधन करण्यात येते. तथापी त्यास लाभधारकांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही.

(४) म्हैसाळ योजनेचे एकूण लाभक्षेत्र ८१६९७ हे. (ICA) इतके असून जून, २०१७ अखेर ३४८६२ हे. सिंचन क्षेत्रातील वितरण व्यवस्थेची कामे करणेत आली असून उर्वरीत कामे प्रगतीत आहेत.

(५) कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाचे काम पूर्णत्वास नेण्याच्या उद्देशाने तसेच सदर प्रकल्प प्रधानमंत्री सिंचन योजनेत समाविष्ट असल्याने कामाची निकड विचारात घेवून कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पास दिनांक ०३/०७/२०१७ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत रु.४९५९.९१ कोटी इतक्या किंमतीच्या चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार प्रकल्पाची उर्वरीत कामे डिसेंबर, २०१९ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## भंडारा, पवनी व तुमसर (जि.भंडारा) नगरपालिकाक्षेत्राच्या सर्वेक्षणात कुपोषित बालके आढळल्याबाबत

**(८४) * ३४२६९ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा, पवनी व तुमसर (जि.भंडारा) या तीन नगरपालिकाक्षेत्रात बालविकास प्रकल्प अधिकारी नागरी कार्यालयांतर्गत केलेल्या सर्वेक्षणात सुमारे ४१६ बालके कुपोषित असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयात राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना प्रभावीपणे राबविण्यात येत नसल्याने कुपोषित बालकांची संख्या वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे मे-२०१७ च्या प्रकल्प कार्यालयाच्या मासिक प्रगती अहवालानुसार मध्यम तीव्र कुपोषित ३१३ व अति तीव्र कुपोषित २३ असे एकूण ३३६ बालके आहेत. तसेच साधारण श्रेणीमध्ये ६६४२ बालके आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील भटक्या विमुक्तांसाठी वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) स्थापन करण्याबाबत

**(८५) * ३१०७२ श्री.हरिसिंग राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक १४६३० ला दिनांक १७ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) धर्तीवर भटक्या विमुक्तांसाठी स्वतंत्रपणे वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) स्थापन करण्याबाबत वेगवेगळ्या संघटनांमार्फत व भटक्या विमुक्तांच्या मोर्च्यातूनही मागणी करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था, वनार्टी ही बार्टीच्या धर्तीवर स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय.

(२) व (३) सदरहू प्रकरणी तपासणी करण्यात येत आहे.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील ग्रामपंचायतींना सौरदिप पुरविण्याबाबत

**(८६) * ३२५१८ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात शासनाच्या ग्रामविकास व जलसंधारण विभागामार्फत पर्यावरण संतुलित ग्रामसमृध्द योजनेत पात्र ठरलेल्या ग्रामपंचायतींना अद्यापपर्यंत सौरदीप पुरविण्यात आले नसल्याचे दिनांक ५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेत ग्रामपंचायतींच्यावतीने भरावयाचा हिस्सा जमा करण्यात आला असूनही ग्रामस्थांना अद्यापी सौरदीप मिळाले नसल्याने त्यांनी या योजनेची अंमलबजावणी करावी अन्यथा ग्रामपंचायतींनी भरलेली रक्कम व्याजासह परत करावी, अशी मागणी राजापूर तालुक्याच्या आमसभेत केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय.

(३) सन २०१०-११ मध्ये पर्यावरण संतुलित ग्राम समृध्द योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्हयात १७७ ग्रामपंचायतीमध्ये प्रत्येकी ३ या प्रमाणे ५३१ सौरपथ दिवे कृषी सोलार, पुणे या एजन्सीमार्फत बसविण्यात येणार होते.

तथापि सदर एजन्सीने ५१ ग्रामपंचायतीमध्ये १५३ सौरपथ दिवे कार्यान्वित केले. उर्वरित १२६ ग्रामपंचायतीमध्ये ३७८ सौरपथ दिवे बसविण्यात आले नाही.

तथापि सदर सौरपथ दिव्याकरीता १२६ पैकी ११९ ग्रामपंचायतींचे प्रत्येकी सौरपथ दिव्या करीता ग्रामपंचायत हिस्सा रुपये ११५००/- याप्रमाणे एकूण रुपये ४१,०५,५००/- इतकी रक्कम जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडे जमा आहे. सदर रक्कम ग्रामपंचायतींना परत देण्याबाबत जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी शासनाकडे मार्गदर्शन मागितलेले होते. यानुषंगाने संबंधित ग्रामपंचायतींना त्यांचा हिस्सा तात्काळ परत करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धामणशेत (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील ग्रामसेवकांनी अपहार केल्याबाबत

**(८७) * ३२६१५ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणशेत (ता.मोखाडा, जि.पालघर) ग्रामपंचायतीला सन २०१२-१३ मध्ये तंटामुक्ती पुरस्काराचे मिळालेले रुपये तीन लाख रक्कमेचा ग्रामसेवक शेखर वाघ व राजेश रासकर यांनी अपहार केल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खेर आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

महात्मा गांधी तंटामुक्ती अभियानाच्या पुरस्काराची रुपये तीन लाख इतकी प्राप्त रक्कम महात्मा गांधी तंटामुक्त समिती, धामणशेत-कोशिमशेत यांच्या खात्यावर जमा झाली होती. दिनांक ३/४/२०१३ रोजीच्या ग्रामसभेच्या ठराव क्रमांक ७ नुसार सदर पुरस्काराच्या रकमेपैकी प्रचार व प्रसिध्दीसाठी रूपये ५०००/-, सादिल खर्च यासाठी रूपये १०,५००/-, वृक्ष लागवडसाठी रूपये १०,०००/-, अंगणवाडी दुरूस्तीसाठी रूपये ९८,५००/-, सार्वजनिक आरोग्यासाठी रूपये ७५,०००/-, सौर पथदिवे यासाठी रूपये ४०,०००/-, प्रशासकीय व कार्यालयीन खर्च यासाठी रूपये ८,०००/-, कचराकुंडी खरेदीसाठी रूपये ३०,०००/-, विहीरीतील गाळ काढणे यासाठी रूपये २३,०००/- खर्च करण्यात आला आहे.

ग्रामपंचायतीने सदर खर्च करताना आवश्यक त्या बाबींची दरपत्रके मागविली आहे. सदर खर्चाची दरपत्रके, देयके, अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका ग्रामपंचायतीच्या दप्तरी उपलब्ध आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य शासकीय सेवेत सन २००५ मध्ये नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युईटीचा लाभ देण्याबाबत

**(८८) * ३२८५१ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेत सन २००५ मध्ये दाखल झालेल्या कर्मचा-यांना ग्रॅज्युईटीचा लाभ देण्याचा निकाल महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिला असल्याचे माहे एप्रिल, २०1७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निकालाच्या अनुषंगाने शासनाने सदर कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युईटीचा लाभ देण्याबाबत निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी वित्त विभागाच्या दिनांक ३१/१०/२००५ च्या शासन निर्णयामधील तरतूदींच्या विसंगत आदेश पारित केले आहेत. तसेच सेवा उपदान कोणत्या नियमानुसार करावे याबाबत स्वयंस्पष्ट आदेश दिलेले नाहीत. यासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे पुनर्निरीक्षण अर्ज दाखल करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकिय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर संलग्नित क्षयरोग रुग्णालयातील अस्वच्छतेबाबत

**(८९) * ३२७७५ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर संलग्नित क्षयरोग रूग्णालयाच्या बाजूने झुडूपे, गंजलेले फलक, तुटलेले फाटक, मोडकळीस आलेली इमारत, पथदिव्याच्या अभाव इत्यादी गैरसोईमुळे सदर परिसरात मोठ्या प्रमाणात अस्वछता निर्माण झाल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे सदर रुग्णालयात औषधोपचार घेणाऱ्या रुग्णांच्या तसेच परिसरातील जनतेच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लासलगाव (ता.निफाड, जि.नाशिक) येथील वैद्यकीय अधिक्षकांना निलंबित करण्याबाबत

**(९०) * ३१११६५ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासलगाव (ता.निफाड, जि नाशिक) येथील ग्रामीण रूग्णालयामधील वैद्यकीय अधिक्षक यांना निलंबित करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव माहे मे, २०१७ पर्यंत शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये लासलगाव येथे आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, नाशिक यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये सादर केलेल्या अहवालामध्ये निलंबनाची शिफारस केलेली नसून बदली करण्याबाबत शिफारस केली होती. त्यानुसार शासन आदेश सा.आ.वि.क्र.बदली-२०१६/प्र.क्र.१८३/सेवा-२, दिनांक ३१/०५/२०१६ नुसार त्यांची ग्रामीण रुग्णालय, दिंडोरी येथे बदली करण्यात आलेली आहे.
जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, नाशिक यांच्या स्तरावरुन संबंधित वैद्यकीय अधिक्षकास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यांना सक्त ताकीद देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयांकडून अपंगांना प्रमाणपत्र देण्यास विलंब होत असल्याबाबत

**(९१) * ३२४२८ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात तपासणी झालेले अडीच हजार अपंग प्रमाणपत्राच्या प्रतिक्षेत असताना अपंगांना सात महिन्यानंतरची तारीख देण्यात येत असल्याने अपंगांना शासनाच्या विविध योजनापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार अपंगांना रुग्णालय प्रशासनाकडून लवकर प्रमाणपत्र मिळावे म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यात होमोफिलिया औषधाचा तुटवडा असल्याबाबत

**(९२) * ३१०३० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) होमोफिलियाच्या औषधाच्या किंमती आवाक्यात येवून अधिकाधिक रूग्णांना त्यांचा लाभ मिळावा यासाठी शासनाने औषध कंपन्यांची मक्तेदारी मोडित काढून या औषधातील घटक द्रव्याचे सुलभीकरण करुन व निविदा प्रक्रिया सुरू करुनही मुंबईसह राज्यातील होमोफिलियाच्या रुग्णांची इंजेक्शनच्या तुटवडयामुळे गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, होमोफिलियाच्या रूग्णांच्या रक्तातील नवव्या आणि सातव्या क्रमांकाचे घटक असलेल्या इंजेक्शनचा राज्यात तुटवडा निर्माण झाल्यामुळे रक्त साकळून अधिकाधिक गुंतागुंत निर्माण होईल अशी भिती होमोफिलियाग्रस्तांना वाटत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या इंजेक्शनच्या वायल्स महागडया असल्याने त्या विकत घेवून खाजगी रूग्णालयामध्ये उपचार घेणे रुग्णांना परवडत नसल्याने सदर औषधे तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले असून त्याची पूर्तता झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन होमोफिलियाच्या इंजेक्शनचा तुटवडा विनाविलंब दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

दारिद्र्य रेषेखालील रुग्ण तसेच तातडीचे (emergency) रुग्ण यांच्यावर होमोफिलिया आजावरील उपचार मोफत करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने दिनांक १९/०३/२०१३ रोजी आदेशित केलेले आहे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राज्यामध्ये प्रायोगिक तत्वावर जिल्हा रुग्णालय, ठाणे, नाशिक, सातारा व अमरावती तसेच के.ई.एम. रुग्णालय, मुंबई व बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे या सहा ठिकाणी होमोफिलिया या आजारावर मार्च, २०१३ पासून मोफत उपचार करण्यात येत आहेत.

(४) होमोफिलिया आजारावरील औषधांच्या खरेदीबाबत आरोग्य सेवा संचालनालयामार्फत दिनांक २२/०६/२०१७ रोजी पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागातील परिचारिकांच्या समस्यांबाबत

**(९३) * ३२६५१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागातील आरोग्य सेवेत काम करणा-या परिचारिकांच्या समस्यांबाबतचे एक लेखी निवेदन लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनात परिचारिकांच्या प्रशासकीय बदलीची अट वयोमर्यादा वय वर्ष ५३ ऐवजी वय वर्ष ४५ वर्ष करण्यात यावे, पुणे जिल्हयामध्ये ५९० ए.एन.एम. च्या पदांपैकी ६४ पदे रिक्त असणे तसेच आरोग्य उपकेंद्रनिहाय अर्धवेळ स्त्री परिचर यांच्या ५९० मंजूर पदांपैकी १७५ पदे रिक्त असल्यामुळे आरोग्य सेवेचा ताण परिचारिकांवर पडत असल्यामुळे वरील पदे तातडीने भरणे, परिचारिकांना संगणक परिक्षा उत्तीर्ण नसल्याने वेतनवाढ देण्यात न येणे याकरिता संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी २०१७ पर्यंत मुदतवाढ मिळावी इ. मागण्या करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे भरण्याबाबत तसेच परिचारिकांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) राज्यातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवेत काम करणाऱ्या परिचारिकांच्या समस्यांबाबतचे लोकप्रतिनिधींचे लेखी निवेदन सार्वजनिक आरोग्य विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(३) व (४) पुणे जिल्हयासाठी ए.एन.एम (आरोग्य सेविका) या संवर्गातील एकूण ६५० पदे मंजूर असून ५७८ पदे भरली आहेत आणि ७२ पदे रिक्त आहेत. तसेच अर्धवेळ स्त्री परिचरांची ५३९ पदे मंजूर असून ३७५ पदे भरली आहेत आणि १६४ पदे रिक्त आहेत. ए.एन.एम. ची ७२ रिक्त पदे तसेच अर्धवेळ स्त्री परिचराची १६४ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही जिल्हा परिषद कार्यालय पुणे यांचेमार्फत करण्यात येत आहे.

-----------------

## हिरडपाडा (ता.जव्हार, जि.पालघर) येथील पर्यटन स्थळ विकसित करण्याबाबत

**(९४) * ३४२०८ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिरडपाडा (ता.जव्हार, जि.पालघर) येथे नैसर्गिक धबधबा असून पर्यटक विभागामार्फत सदर पर्यटन स्थळ विकसित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पत्राद्वारे मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पर्यटनस्थळाचा विकास झालेला नसल्याने तेथे सोईसुविधा उपलब्ध नसल्यामुळे पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व पर्यटनाचा विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) प्रश्नाधिन निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इंदिरा गांधी शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय (मेयो), नागपूर येथे डायलेसिस रुग्णांची फसवणूक झाल्याबाबत

**(९५) * ३१३२८ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इंदिरा गांधी शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रूग्णालय (मेयो) नागपूर येथे सार्वजनिक खासगी भागीदारी तत्वावर सुरू झालेल्या डायलेसिस केंद्राकडून प्रति रूग्ण रुपये ४००/- शुल्क तरतूद असताना रूग्णांकडून प्रत्यक्षात रूपये १६००/- घेवून रूग्णांची फसवणूक करीत असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रूग्णांची फसवणूक करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात व्याघ्र संरक्षणासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(९६) * ३१२८९ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २६९८९ ला दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०१७ मध्ये जानेवारी ते मे या पाच महिन्याच्या कालावधीत ६० वाघांचा मृत्यू झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जय या प्रसिध्द वाघाचा छावा श्रीनिवासन याचा मृत्यू शेतकऱ्याने शेतात लावून ठेवलेल्या विद्युत प्रवाहाचा शॉक लागून झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, व्याघ्र संरक्षणापेक्षा व्याघ्र पर्यटनाकडे जास्त लक्ष दिले जात असल्याने वाघांच्या मृत्यूंच्या घटनेत वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन व्याघ्र संरक्षणाच्या कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार** : (१) हे खरे नाही.

राज्यात माहे जानेवारी, २०१७ ते मे, २०१७ या पाच महिन्यांच्या कालावधीत नैसर्गिकरित्या ६ तर शिकारीने २ असे एकूण ८ वाघांचे मृत्यू झालेले आहेत.

(२) हे खरे आहे.

श्री. महादेव बाबुराव ईरपाते रा. कोथुळना यांचे शेतात गट क्र.१४६ मध्ये श्रीनिवास (T-१०) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या वाघाची विद्युत प्रवाहाचा शॉक लावून शिकार केल्याचे दिनांक २४/०४/२०१७ रोजी निदर्शनास आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) खापा वनपरिक्षेत्रात मौजा महारकुंड येथील शेत सर्व्हे क्रमांक २८ मध्ये दिनांक १३/०१/२०१७ रोजी विद्युत प्रवाहामुळे एका वाघाचा (मादी) मृत्यू झाला आहे. प्रस्तुत प्रकरणी दोन व्यक्तींविरुध्द वन गुन्हा नोंदवून त्यांना न्यायालयात हजर केले असता १० दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली असून पुढील चौकशी व न्यायालयीन प्रक्रिया सुरु आहे.

ब्रम्हपुरी वनविभागातील नागभिड वनपरिक्षेत्राचे मांगली नियतक्षेत्रात महादेव बापुराव इरपाते, रा.कोथुळना यांचे शेत गट क्र.१४६ मध्ये वाघाची शिकार करुन त्याचे शव जमिनीत पुरल्याची माहिती मिळताच पुढील तपासाच्या प्रकरणी दोन व्यक्तीना अटक करुन न्यायालयात हजर केले असता वनकोठडी देण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## इसवली-पनोरे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील रस्त्यांची व गटारांची दुरुस्ती करण्याबाबत

**(९७) * ३३४०७ श्री.नागोराव गाणार, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३०८१४ ला दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इसवली-पनोरे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील ग्रुप ग्रामपंचायतींतर्गत येणाऱ्या इसवली गावातील इसवली सुतारवाडी व्हाया रेवटेवाडी ते नवलादेवी मंदिर या रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे मे, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण व गटाराची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तसेच नागरिकांनी मा.मुख्यमंत्री, मा.ग्रामविकास मंत्री, मुख्य कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांना लेखी निवेदनाद्वारे दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार इसवली-पनोरे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील इसवली सुतारवाडी प्राथमिक शाळा ते रेवटेवाडी, प्रजिमा ६३ ला जोडणारा रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र.११२ दर्जाचा असून सन २०१५-१६ मध्ये डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत उक्त रस्त्याचे खडीकरण करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रस्त्याचे खडीकरणाचे काम पूर्ण झाले असून या रस्त्यांचे डांबरीकरण व गटार दुरुस्तीचे काम अद्यापपावेतो प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या कामासाठी त्वरीत निधी उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व उक्त काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) व (६) इसवली सुतारवाडी प्राथमिक शाळा ते रेवटेवाडी प्रजिमा ६३ ला जोडणारा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.११२ आहे. रस्त्याची एकूण लांबी ३.५०० कि.मी. असून सदर रस्त्याच्या ०.६०० कि.मी. लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम सन २०१२-२०१३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत या रस्त्याचे खडीकरण करण्याचे रुपये १.०० लक्षचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेला विविध योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून कामाची निकड व प्राथम्यक्रमानुसार रस्त्यांची कामे हाती घेतली जातात.

प्रश्नांकित रस्त्याच्या डांबरीकरणाचे व गटार दुरुस्तीचे काम रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत उपलब्ध निधी व निकषाच्या अधिन राहून टप्प्या-टप्प्याने प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.

-----------------

## राज्यातील शासकिय वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक तसेच अधिव्याख्याते खाजगी व्यवसाय करीत असल्याबाबत

**(९८) * ३२२२६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सोळा वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक तसेच अधिव्याख्याते रुग्णालयाव्यतिरिक्त खासगी व्यवसाय करीत असल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकाराला आळा घालण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांनी राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक पध्दतीने उपस्थिती सक्तीची करताना त्याची जोडणी आधार व वेतनाशी संलग्न करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आदेशाची अंमलबजावणी करण्यास वैद्यकीय शिक्षण विभाग विलंब करीत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदेशाची अंमलबजावणी करण्यास दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर कारवाई करुन शासकिय वैद्यकिय महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही, बहुतांश वैद्यकीय महाविद्यालयांत बायोमेट्रिक पध्दतीने उपस्थिती सक्तीची केलेली आहे. तसेच त्याची जोडणी आधार व वेतनाशी संलग्न करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक मशिन बसविण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोतवाल (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथील धरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(९९) * ३३३२३ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोतवाल (ता.पोलादपूर, जि.रायगड) येथे जलसंधारण विभागामार्फत प्रस्तावित असलेल्या धरणाचे काम प्रशासकीय अडचणीमुळे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी मा.जलसंधारण मंत्री यांना दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही

(२) नाही.

(३) कोतवाल ल. पा. योजनेचे काम सुरु करण्याकरिता २९.६०.७ हेक्टर क्षेत्राचे भुसंपादन लवकर होणे आवश्यक असल्याने, खरेदी पध्दतीने जमीन खरेदी करण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड यांना दिनांक २८/४/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. भुसंपादन प्रक्रिया पुर्ण करुन कोतवाल ल. पा. योजनेचे काम सुरु करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयावर नियंत्रण ठेवण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत

**(१००) * ३१०५१ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हा रुग्णालयाच्या कारभाराबाबत अनेक तक्रारी येत असून जिल्ह्यातील जनतेला योग्य प्रकारे आरोग्य सेवा देण्याच्या व आरोग्य सेवा सुधारण्याच्यादृष्टीने जिल्हा रुग्णालयाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी समिती गठित करण्यात येईल असे प्रतिपादन जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुसार समिती गठीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग येथे नवीन समिती गठीत करण्यात येणार नसून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या रुग्ण कल्याण समितीच्या बैठकीमध्ये रुग्णालयाच्या कारभाराचा संपूर्ण आढावा घेण्यात येणार आहे. रुग्णसेवेबाबत रुग्ण कल्याण समितीची बैठक जिल्हाधिकारी स्तरावर आयोजित करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयातील आयुर्वेदिक दवाखाने बंद असल्याबाबत

**(१०१) * ३३३०५ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयांतील २७ आयुर्वेदीक दवाखाने मागील पाच वर्षापासून बंद करण्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १३ वने या शिर्षकांतर्गत चालविण्यात येणाऱ्या आयुर्वेदीक दवाखान्यांना चालविण्यासाठी प्रतिवर्षी रुपये एक कोटीचा खर्च येत असल्याने हा खर्च करण्यास जिल्हा परिषदेने नकार दिला असल्याने तसेच वन विभागाकडून निधी मिळत नसल्यामुळे सदर दवाखाने बंद करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दवाखाने बंद असल्यामुळे जिल्हयातील नागरिकांचे हाल होत असून त्यांना उपचाराकरीता जिल्हयाबाहेर जावे लागत असल्याने याबाबत नागरिकांनी वेळोवेळी संबधित विभागाकडे तक्रार व निवेदने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद राजस्व (१३ वने) अंतर्गत अर्थसहाय्य करण्यात येत असलेले १० दवाखाने (आयुर्वेदिक ७ व ॲलोपॅथिक ३) जिल्हा परिषदेकडून निधी मिळणे बंद झाल्याने सन २०१२-१३ पासून बंद करण्यात आले आहेत.

(३) हे खरे नाही.

१० दवाखान्यांपैकी ८ ठिकाणी उपकेंद्रे कार्यरत असून उर्वरीत २ ठिकाणी १ कि.मी. अंतरावर उपकेंद्रे कार्यरत आहेत. त्यांच्यामार्फत जनतेस आरोग्य सेवा दिल्या जातात.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडगांव (गांजा) (ता.जि.उस्मानाबाद) येथील बंधाऱ्याच्या दुरुस्तीबाबत

**(१०२) * ३३६९८ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगांव (गांजा) (ता.जि.उस्मानाबाद) येथील बंधाऱ्याचे ५ दरवाजे नाहिसे झाल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन वर्षापूर्वी सिमेंट बंधा-याचे काम निकृष्ट झाल्याने नाला सरळीकरणाचे काम होऊनही लाखो लिटर पाणी वाहून वाया गेल्यामुळे ग्रामस्थांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने दरवाजे लावणे व सिमेंट नाला बंधाऱ्याच्या कामाच्या दुरुस्तीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) हे खरे नाही.

वडगाव (गांजा) हे गाव उस्मानाबाद तालुक्यातील नसून लोहारा तालुक्यातील आहे.

(२) हे खरे नाही.

(३) यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, लघु सिंचन (जलसंधारण) उपविभाग, उमरगा यांनी प्रस्तुत स्थळी जाऊन पाहणी केली असून त्यांचे पाहणी अहवालानुसार गावालगत दोन सिमेंट बंधारे, एक को.प. बंधाऱ्याचे काम करण्यात आले आहे. कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे काम वल्ड व्हिजन ऑफ इंडिया व लोकसहभागातून पूर्ण करण्यात आले असून कोल्हापूरी पध्दतीचा बंधारा बाह्यता सुस्थितीत असून यास पूर्वीपासूनच एकही दरवाजा बसविलेला नाही. सिमेंट नाला बांध सुस्थितीत असून सिमेंट नाला बांधास कोठेही गळती आढळून आली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नापूर (ता.मानवत, जि.परभणी) येथील जलयुक्त शिवार अभियानाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१०३) * ३३९१२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकित प्रश्न क्रमांक २९३९९ ला दिनांक १६ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नापूर (ता.मानवत, जि.परभणी) येथील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नाला खोलीकरणाच्या कामात निविदा प्रक्रिया व गैरप्रकार यांची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी मराठवाडा जनता विकास परिषदेने माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी गैरप्रकार करणारे अधिकारी, कंत्राटदार व यंत्रणा यांची जिल्हयाबाहेरील त्रयस्त यंत्रणेकडून चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) मौजे रत्नापूर, ता.मानवत येथील पाच नाला खोलीकरणाच्या कामाची टीम लिडर, वाप्कोस लातूर या त्रयस्थ संस्थेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. त्रयस्थ संस्थेच्या चौकशी अहवालानूसार कामाची अंदाजपत्रके व

मोजमाप पुस्तिकाप्रमाणे खोलीकरणाच्या कामात प्रत्यक्षात तफावत असल्याचे नमूद केले आहे. तसेच सदर कामाशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे एकूण ०५ गटावर रू.१,२५,२८२/- ची वसुली प्रस्तावित केलेली असून वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात परवाना नुतनीकरण न करता व्यवसाय करणाऱ्या आयुर्वेदिक डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

**(१०४) * ३४३६४ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात १८ हजारापेक्षा अधिक आयुर्वेदिक डॉक्टर परवान्याचे नुतनीकरण न करताच व्यवसाय करीत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परवाना नुतनीकरण न करता व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसायी अधिनियम १९६१ च्या कलम २३ नुसार ज्या वैद्यकीय व्यवसायींनी पुरेशी संधी देऊन सुध्दा नोंदणीचे नुतनीकरण केले नाही, अशा व्यवसायिकांची यादी शासन राजपत्र दिनांक २८/०९/२०१२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.
(२) तथापि, महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम २३ प्रमाणे विहित कालावधीमध्ये दंडाची रक्कम भरणा केल्यानंतर संबंधित व्यवसायिकांच्या नोंदणीचे नुतनीकरण करण्याची तरतूद आहे. त्यानुसार ७५२८ व्यवसायिकांनी नोंदणीचे नुतनीकरण केले आहे.

तसेच शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या यादीतील नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकांपैकी नोंदणी क्र. १ ते नोंदणी क्र. १०००० पर्यंत काही वैद्यकीय व्यवसायिक मृत झाले असून त्यांचा महानगरपालिका /नगरपालिका/ग्रामपंचायतचा मृत्यूचा दाखला व नोंदणी प्रमाणपत्र महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीनला प्राप्त झाल्यानंतर संबंधितांची नोंदणी कायमस्वरुपी रद्द करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाघोडे (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१०५) * ३२५०४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील सागरगड डोंगर रांगेमध्ये माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान ढगफुटी होवून झालेल्या अतिवृष्टीमुळे वाघोडे गावाला जोडणाऱ्या नदीवरील पुलाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पूल नादुरूस्त झाल्यामुळे पूल दुर्घटना होवून जीवितहानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाचे संरचनात्मक लेखापरिक्षण करून दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. वाघोडे गावाला जोडणाऱ्या रस्त्यावर एक लहान पुल व एक स्लॅब ड्रेन आहे. पैकी लहान पुल सुस्थितीत असून वाघोडे गावाजवळील स्लॅब ड्रेन नादुरुस्त झालेला आहे.
(२) अतिवृष्टीमुळे स्लॅबड्रेनचे दगडी ॲबटमेंट नादुरुस्त झाल्याने तात्पुरती डागडुजी करुन रस्ता वापरात आहे.

(३) व (४) सदर स्लॅबड्रेनची पाहणी करुन प्रत्यक्ष जागेवर आवश्यक असणाऱ्या संरक्षक भिंती व नवीन स्लॅबड्रेनची पुनर्बांधणी या कामाचे रुपये १५.०० लक्षचे काम सन २०१७-१८ जिल्हा नियोजन विभागाकडे ५०५४ साकव बांधणे या कार्यक्रमातून मंजूरीसाठी जिल्हा परिषदेमार्फत पाठविण्यात आले आहे.

-----------------

## मौजे वळवाडे (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथील बंधारा प्रकल्पास पाणी उपलब्धतेचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत

**(१०६) * ३२०७६ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वळवाडे (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथील मोसम नदीवरील सिमेंट कॉक्रींट बंधारा प्रकल्पाकरिता तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचेकडे प्रदिर्घ काळापासून प्रलंबित पाणी उपलब्धतेचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत स्थानिकांनी केलेल्या मागणीस अनुसरून लोकप्रतिनिधी (नाशिक) यांनी दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे पत्रान्वये विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे यांनी त्यांचेकडील जा.क्र. प्रशा-३/२३३६, दिनांक २९/८/२०१६ अन्वये सदर प्रस्तावास ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करणेविषयी मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव यांचेकडे शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे वळवाडे गांव परिसरासाठी उक्त उपयुक्त असलेल्या या बंधाऱ्यात पाणी उपलब्ध होण्यासाठी मागील ५ वर्षापासून मागणी केली जात असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय,

(२) होय,

(३) व (४) गिरणा उप खोरे हे तुटीचे खोरे असून खोऱ्यातील उपलब्ध जलसंपदेपेक्षा सिंचन व बिगर सिंचनाची मागणी जास्त आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियामन प्राधिकरण, मुंबई यांचेकडे गिरणा उप खोऱ्यातील समन्यायी पाणी वाटपासंदर्भात दावा क्र.८/२०१५ निर्णय दिनांक २१/१२/२०१५ अन्वये प्राधिकरणाने दिला आहे. या निर्णयातील मुद्दा क्र. ७ मध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे.

No new project on upstream of Girna Project are to be planned as proposed to the order of 152.83 Mm3, which will further reduce the availability of Girna Project.

वरील प्रमाणे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या निर्णयानुसार पाणी उपलब्ध प्रमाणपत्रासाठी महामंडळास सद्य:स्थितीत ना-हरकत प्रमाणपत्र देता येत नाही, असे दिनांक १६ जुलै, २०१६ च्या पत्रान्वये मुख्य अभियंता (जलसंधारण) पुणे यांना वस्तुस्थिती कळविली आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.